# सत्यमेव जयते

- कथा, पटकथा, संवाद, गाणी -

## प्रल्हाद जाधव

❖❖❖

*चित्रपट कालावधी* - *2 तास 20 मिनिटे*

*चित्रपटकथेचा काळ* - **1980**

***सत्य, अहिंसा, नितीमूल्ये यांचा पुरस्कार भारतीय संस्कृतीने नेहेमीच केला आहे. विविध कलांच्या माध्यमांतून या मूल्यांचा उद्घोष सातत्याने होताना दिसतो. दैनंदिन जीवनसंघर्ष आणि त्याच्या भोवतीचे सामाजिक वास्तव याचे चित्रण करणारी ही कहाणी आहे १९८० च्या सुमाराची! आपल्या अवती-भोवती कुठेही घडावी आणि त्यातील सत्यदर्शनाने अंतर्मुख होऊन जावे अशी ही कथा आधुनिक काळातील भारतीय जीवनशैलीचे प्रातिनिधिक प्रतिबिंब असून साऱ्यांनाच आनंद देऊन जाईल.***

***या कथेतील घटना-प्रसंग-व्यक्तिरेखा पूर्णपणे काल्पनिक असून त्यात काही साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा.***

# पात्र योजना

| क्र. | नाव | वय |
|---|---|---|
| 1 | आमदार विक्रमसिंह मोहिते | 50 |
| 2 | सर्जेराव मोहिते (आमदारांचा मुलगा) | 21 |
| 3 | शुभांगी बापट (कलेक्टर) | 21 |
| 4 | भगवानराव पवार (पोलिस अधिक्षक) | 50 |
| 5 | नानासाहेब पटवर्धन (स्वातंत्र्यसैनिक) | 70 |
| 6 | बापूसाहेब गोटखिंडे (स्वातंत्र्यसैनिक) | 70 |
| 7 | दत्तोपंत तुळपुले (स्वातंत्र्यसैनिक) | 70 |
| 8 | सुभद्राबाई (नानासाहेबांची पत्नी) | 65 |
| 9 | माधुरी (नानासाहेबांची दत्तक मुलगी) | 30 |
| 10 | निवेदिता (नानासाहेबांची नात) | 10 |
| 11 | विजय (माधुरीचे पती) | 35 |
| 12 | कॅप्टन अजित सोनावणे | 35 |
| 13 | बेबी (कॅ.अजित सोनावणे यांची बहीण) | 25 |
| 14 | राजाराम (कॅ.अजित सोनावणे यांचा सहकारी) | 25 |
| 15 | शांताबाई (दत्तोपंत तुळपुलेंची पत्नी) | 65 |
| 16 | वत्सलाबाई (बापूसाहेब गोटखिंडेंची पत्नी) | 65 |
| 17 | श्री. मनमोहन शिर्के (निवासी उपजिल्हाधिकारी) | 50 |
| 18 | श्री. प्रकाश कराडकर (होम डीवाय.एस.पी.) | 30 |
| 19 | श्री.मकरंद देशपांडे (बँक मॅनेजर) | 40 |
| 20 | बिजली (लावणी नर्तिका | 25 |
| 21 | रूपाली (सर्जेरावची पत्नी) | 19 |
| 22 | बाजीराव अप्पा (सजैरावचा मित्र) | 25 |
| 23 | काकासाहेब (पालकमंत्री) | 60 |
| 24 | उमेश (गोटखिंडेंचा पुतण्या) | 30 |

*(शिवाय अधिकारी-कर्मचारी, गावकरी, चौकातील दुकानदार, प्रमुखपात्रांचे सहकारी अशी मिळून सुमारे 200 पात्रे)*

## कथेत येणारी स्थळे

1. जिल्ह्याच्या ठिकाणचे शहर
2. रहदारीने आणि दुकानांनी गजबजलेला चौक
3. कलेक्टर ऑफीस/कलेक्टर बंगला
4. बैठकीचा मोठा हॉल
5. शहराबाहेरील वस्ती
6. नानासाहेब, तुळपुले, गोटखिंडे यांची घरे
7. आमदारांचे घर
8. शाळा
9. गॅरेजवजा गोडाउन
10. बार
11. प्रिंटींग प्रेस
12. फोटो स्टुडिओ/डार्क रूम
13. पोलिस स्टेशन
14. चौकातील गांधीजींचा पुतळा
15. रेल्वेस्टेशन
16. लग्नाचा हॉल
17. पोल्ट्री फार्म
18. फार्म हाऊस
19. दुष्काळी तालुक्यातील एक उजाड गाव
20. रेशन दुकान

(सनईच्या प्रसन्न सुरांनी वातावरण भरून गेलंय. कॅमेरा ओपन होतो तेव्हा फ्रेमध्ये आऊट फोकस झालेली गुलाबाची फुले. हळूहळू फोकस क्लिअर होतो. मोहिते-पाटील शुभविवाह अशी फुलानी सजवलेली अक्षरे दिसतात. गुलाबदाणी घेतलेला हात दिसतो. गुलाबदाणी हलते त्यातून गुलाबपाणी पडते ते एका खाकी शर्टवर. नंतर अनुक्रमे आमदार मोहिते आणि पोलिस अधीक्षक सावंत यांचे प्रसन्न चेहेने दिसतात. मोहिते दारातच उभे राहून त्यांच्या अंगावर गुलाबपाणी शिंपडतात.)

सावंत : वा: वा: आमदारसाहेब तुमच्या ह्या गुलाबपाण्यामुळं अगदी प्रसन्न वाटलं बघा.

आमदार : एस.पी.साहेब तुमच्या सगळ्या आवडीनिवडी अगदी तोंडपाठ हायेत आम्हाला. (दोघेही जोरदार हसतात) या या (असे म्हणून त्याना वधू-वराना भेटण्यासाठी घेऊन जातात.)

आमदार मोहितेंच्या मुलाचं-सर्जेरावाचं लग्न झालेले आहे आणि जंगी स्वागत समारंभ सुरू आहे. सर्जेराव आणि त्याच्या शेजारी त्यांची नवपरिणित वधू रूपाली सजून बसलेली आहे एस.पी.सावंत येतात सर्जेरावला विश करतात. त्यांच्या पाठोपाठ दोन हवालदार. एक मोठा टी.व्ही.सेट घेऊन उभे आहेत. एस.पी.त्यांना खुणावतात. ते वर येतात आणि टी.व्ही सर्जेरावाला भेट देतात. त्यावेळी कॅमेऱ्याचा फ्लॅश उडतो. सर्जेरावचे सहकारी तो टी.व्ही उचलून शेजारच्या प्रेझेंट्सच्या ढिगाऱ्यात ठेवतात. आमदार सावंताना घेऊन खाली उतरतात आणि नम्रपणे पंगतीच्या दिशेला हात करतात. भली मोठी पंगत.)

आमदार : सावंतसाहेब अगदी सावकाश व्हवूद्या बरं का.

सावंत : त्याची काहीही काळजी करू नका तुम्ही, खाण्याच्या बाबतीत आम्हाला कोणी शिवण्याची गरज नाही. (मोठ्यानं हसतात.आमदार परत दारात येतात आणि येणाऱ्या जाणाऱ्यांवर गुलाबपाणी शिंपडू लागतात. कार्यकर्त्यांचा एक घोळका आत शिरतो.)

1 : आमदार सायेब नमस्कार

आमदार : नमस्कार

2 : राम राम मोहीते सायेब

आमदार : राम राम या – या... बाजीरावअप्पा...काय मिशी काढली वाटतं ? (हसतात) या... या... अगदी सावकाश व्हवूदे बरंका मंडळी... या या

आन्नासायेब, काय काकूना आनलं न्हाय का? ठीक या... या... (इतक्यात नानासाहेब पटवर्धन, बापूसाहेब गोटखिंडे आणि दत्तोपंत तुळपुले हे तिघे स्वातंत्र्य सैनिक येताना दिसतात. आ.मोहिते आदबीने त्यांच्या पुढे झुकत) वा - वा या नानासाहेब, रामराम संपादक या - या दत्तोपंत या आज बऱ्याच दिसानी ह्या त्रिमुर्तीच्या दर्शनाचा लाभ झाला म्हनायचा.

नानासाहेब : आमदारसाहेब तुम्ही आम्हाला त्रिमूर्ती म्हणून संबोधलत पण खरंतर त्रिदोष असंसुद्धा म्हणायला हरकत नव्हती, बरं का! (सर्जजण हसतात.)

आमदार : या - या आपन आलात आमाला लय आनंद झाला. आपनासारख्या सोतंत्र्य सैनिकांचा आशीर्वाद मिळावा हे सर्जेरावचं भाग्यच समजतो म्या.
(तिघेही सर्जेरावला भेटतात. नानासाहेब खिशातून एक पाकीट बाहेर काढत)

नानासाहेब : सर्जेराव ही आम्हा तिघांची मिळून तुम्हाला ही छोटीशी भेट.

सर्जेराव : थँक्यू व्हेरी मच!

आमदार : (आमदार त्या तिघानाही घेऊन बाजूला येत) आता जेवण केल्याबिगर जायाचं न्हाय बर का!

तुळपुले : माफ करा बरं का आमदारसाहेब...

आमदार : ते का वो?

गोटखिंडे : तुम्हाला माहीत आहे की खाण्यापिण्याच्या बाबतीत अगदी नालायक माणसं आम्ही.

आमदार : आवो आसं कसं व्हईल संपादकसायेब! तुमी आमच्या विरोदात कितीबी बातम्या छापा आमचं काहीही म्हननं न्हाई पर आज आमच्या घरातलं एकुलतं एक मंगलकार्य हाय, तवा हात भिजल्याशिवाय भायेर पडायचं न्हाय.

नानासाहेब : असं करू - आम्ही लिंबूसरबत घेतो, चालेल?

आमदार : जशी आपली मर्जी (ओरडत) शंकर, ह्यास्नी लिंबू सरबत द्या.
(धावत येत) मंत्री सायेब आले.

आमदार : तुमचं सावकाश व्हवू द्या आलोच म्या.
(असं म्हणून लगबगीनं बाहेर येतात. तोवर मंडपाच्या दरात कचकन ब्रेक्स दाबत डीव्ही कार थांबते फटाफट दरवाजे उघडले जातात आणि कार्यकर्त्यांच्या पाठोपाठ जिल्ह्याचे पालकमंत्री काकासाहेब खाली उतरतात. हात जोडून आमदार त्यांचं स्वागत करतात आणि त्यांना आत आणतात.

त्यांच्या मागे कार्यकर्त्यांचा मोठा लवाजमा. प्रेझेंट म्हणून त्यानी मोठमोठी पुडकी बांधून आणलेली आहेत. सर्जेरावला भेट देऊन मंत्री फोटोसाठी उभे राहतात. फ्लॅश उडतो.

नानासाहेब, तुळपुले आणि गोटखिंडे सरबत घेता घेता सर्व वातावरण टिपत सूचकपणे एकमेकांकडे पहात असतात. प्रचंड रोषणाई केलेली. फटाक्यांची आतषबाजी सुरू. बँड वाजत असतो. सर्जेरावाच्या शेजारी प्रेझेंटसचा डोंगर झालेला असतो. एका बाजूला मोठी पंगत बसलेली असते. लाडू जिलबी आदि प्रकारचे मिष्टान्न घेऊन वाढपी धावपळ करीत असतात. अनेकजण ताटात तसेच अन्न टाकून उठतात. काही अन्न खाली पडलेले असते त्यावर लोक पाय देऊन ये-जा करीत असतात. आ.मोहिते यांच्या श्रीमंतीचे जणू काही प्रदर्शनच भरलेले आहे. सर्व वातावरणात भडकपणा.

आमदार काकासाहेबाना घेऊन खाली उतरतात व जेवणावळीकडे वळतात त्यांच्या पाठोपाठ टोळधाडीसारखे कार्यकर्ते असतातच. पंगतीकडे जाताना ताटभर जिलब्या कार्यकर्त्यांच्या पायाखाली तुडवल्या जातात पण कुणालाच त्याचा खेद नसतो. नानासाहेब गोटखिंडे आणि तुळपुले अस्वस्थ होतात तिथूनच हात जोडून आमदाराना रामराम करतात आणि झपाट्यानं बाहेर पडतात.
तिघेही लग्नगृहाच्या बाहेर येतात बाहेर फियाट, अँबेसिडर, मारूती गाड्यांचा ताफाच्या ताफा लागलेला असतो. तिकडे पहात.)

नानासाहेब : संपादकसाहेब तुम्ही तुमची गाडी आणली नाही म्हणून बरं नाही तर इथनं गाडी बाहेर काढायलाच आपल्याला तासभर वेळ लागला असता.

तुळपुले : आपली पायाची गाडी सर्वात उत्तम. हवी तिथं नेता येते आणि हवी तेव्हा सुरू करता येते, हवी तेव्हा थांबवता येते, वर पेट्रोलची गरज नाही. चालतच जाणं बरं.

गोटखिंडे : चला वाटेतच आम्ही आपापल्यां घरी सोडतो, काय चालेन ना तुम्हाला नानासाहेब?

नानासाहेब : हो चालेल की. चला. (निघणार इतक्यात त्यांचे लक्ष एका बाजूला जाते. तिथे भिकारी स्त्री-पुरूष आणि त्यांच्या मुलांनी गर्दी केलेय. भुकेलेल्या डोळ्यांनी ते आत येणाऱ्या-जाणाऱ्याकडे पहात आहेत. पोटं खपाटीला

आणि डोळे खोलवर गेलेल्या त्या भिकाऱ्यांचे ते केविलवाणे दर्शन झाल्यामुळे तिघेही अस्वस्थ होतात.
भिकारी येणाऱ्यांकडे आशेनं पहात हातातली ताटं, पातेली पुढं करून भिक मागत असतात. पण त्याना काहीच मिळत नाही. एवढ्यात पलिकडच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर धपकन काहीतरी पडल्याचा आवाज होतो सर्व भिकारी त्या दिशेनं पहातात तर वाया गेलेले अन्न नोकरानी त्या ढिगाऱ्यावर टाकलेले असते. क्षणार्धात ते सर्व भिकारी त्या ढिगाऱ्यावर तुटून पडतात. ह्या तिघानाही ते दृश्य पहावत नाही आणि मान फिरवून ते लगबगीने चालणे सुरू करतात. पार्श्वभूमीवर गाणे सुरू होते.

काळ बदलला नव्या दिसाची जळे अंतरी होळी
रोजच असले मरणे आले जगण्याच्या भाळी...

न्याय बदलला नव्या युगाचा नवीन आली रीत
नव्या युगाच्या ओठावरचे बदलून गेले गीत
पायाखालील माती आजची मात्र आसवे ढाळी...

नव्या आभाळी नव्या भराऱ्या घेत नवी पाखरे
नवीन गहिवर गळ्यात घेऊन हंबरती वासरे
कळस लोपला आड भिंतीच्या देव रडे राऊळी...

पायतळी ही पडली येथे सुंदर शाश्वत मूल्ये
जळणाऱ्याही सरणामधून भाग्य कुणाचे उजळे
माणूस ठेवून आज पटावर काळ खेळतो खेळी...

माता झाली मादी आजची पुरूषाचे खेळणे
सत्तेच्या बाजारी चाले कुटील नितीचे नाणे
अंधाराला पळे घाबरून प्रकाश रानोमाळी
गाणे सुरू असताना त्याचे चित्रिकरण असे होईल :

(नानासाहेब मान उचलून वर पहातात तर झाडाच्या पानामधून सूर्य सरकत जातो त्याचे प्रखर किरण नानांचे डोळे दीपवून टाकतात. ते जेव्हा मान वळवून पहातात तेव्हा भिकारी  कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर तुटून पडलेले असतात.)

नानांचे लक्ष समोर जाते तर एका टॅक्सीतून एक शेठ खाली उतरतो आणि हातातली पैशाची बॅग घेऊन समोरच्या बँकेत जायला निघतो.

टॉप अॅन्गल वाईड शॉट. तिघेही फूटपाथवरून चालले आहेत. भलामोठा चौक. माणसांची आणि वाहनांची वर्दळ दिसते. मिड क्लोजअप्. एक सायकलवाला रॉंग साईडने फूटपाथवर चढतो आणि नानाना धडक मारतो, वरती त्यांच्यावरच खेकसताना दिसतो. नाना त्याला कोपरापासून हात जोडतात.

गांधीजींच्या चेहेऱ्याचा क्लोजअप त्यांच्या पुतळ्यावरून कॅमेरा टिल्ट होत रस्त्याच्या लेव्हलला येतो आणि विरूद्ध दिशेने येणाऱ्या तिघाना टिपतो. पुतळ्याच्या खांद्यावर एक कावळा बसलेला असतो. नाना हात वर करून त्याला हाकलतात.

आभाळातील काही ढग फ्रेममधून सरकताना दिसतात त्यावरून टिल्ट होत कॅमेरा खाली येतो. उंच इमारतींचे वरचे मजले, झाडांचे शेंडे, विजेच्या तारा या क्रमाने खाली येतो. रस्त्यात दहा-विस गुरे फतकल मारून बसलेली. त्यामुळे ट्रॅफिकजॅम झालेला आहे. पलिकडच्या फूटपाथवर खोक्यांच्या गर्दीत एक छोटेसे मारूतीचे मंदिर. त्यातील शेंदूर माखलेल्या मारूतीचा क्लोज शॉट. मारूतीविषयी करूणा निर्माण व्हावी असे त्याचे दर्शन. तिघेही हात जोडतात.

एक एस.टी.ची गाडी सुसाट वेगाने कॅमेऱ्यात घुसते कचकन ब्रेक्सचा आवाज. चढणाऱ्या-उतरणाऱ्यांची प्रचंड गर्दी. त्यात एक बाई आणि तिच्या हातातील मूल खाली पडते. लोक त्याला तुडवतात. मुलाच्या तोंडाचा रडतानाचा अगदी क्लोजअप. घंटी वाजते, गाडी सुसाट स्टार्ट होते. गाडीच्या दरवाजात बाहेर लटकलेला एक तरूण जाता जाता एका बाईच्या गळ्यातील

मंगळसूत्र खेचतो. ती चोर चोर असे ओरडते तोवर गाडी पुढे निघून गेलेली असते. टॉप ॲन्गलने कॅमेरा लोकांच्या घोळक्याचे चित्रण करतो. तो घोळका हळूहळू झाडांच्या फांद्यात आणि आभाळातील ढगात डिझॉल्व होत जातो.)

संध्याकाळ. एका अंधाऱ्या बोळाच्या तोंडाशी भडक मेकअप केलेल्या काही वेश्यांचा घोळका. एक तरूण एका वेश्येला डोळा मारतो. तिचा उत्तेजक प्रतिसाद.

अतिशय वैभवाचे प्रतीक वाटावे अशा एका चेंबरमधून आमदारसाहेब फोनवर बोलताहेत. बोलताना त्यांच्यातील धूर्तपणा जाणवतो. काम फत्ते झाल्याचं ओळखून ते मोठ्या खूषीनं हसतात.

गाणे संपता संपता नानासाहेब हात हलवून दोघांचा निरोप घेतात. ते घरात येतात तर त्यांची मुलगी माधुरी आतील दरवाजाच्या चौकटीला टेकून बसलेली. तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळत आहेत. माधुरी ही त्यांनी निराधार आश्रमातून दत्तक घेतलेली मुलगी त्यांना स्वत:चे अपत्य नाही. त्यांची पत्नी सुभद्राबाईही विमनस्कपणे माधुरीच्या शेजारी बसलेली. त्याना त्या अवस्थेत बघून नानासाहेब कासावीस होतात.

नानासाहेब : (चपला काढत.) काय झालं माधुरी ? (पत्नीकडे पहात.) काय झालं हिला असं रडायला ?

सुभद्राबाई : दुसरं काय होणार? पुन्हा तेच स्वप्न. चार गुंड येतात आणि चाकू खुपसून जावईबापूंचा खून करतात. (माधुरीला हुंदका फुटतो आणि ती बांध फुटल्यासारखी रडायला लागते.)

नानासाहेब : असल्या अभद्र गोष्टी मनात आणू नकोस बेटा जावईबापूंचं काहीही बरं-वाईट झालेलं नाही. धीर धर.

माधुरी : कुठवर धीर धरायचा ?

नानासाहेब : परमेश्वर आपली सत्वपरीक्षा घेतोय असं समजू आपण.

माधुरी : अजून किती जीवघेणी परीक्षा घेणार आहे तो ? वर्ष झालं ते बेपत्ता झाले त्याला. पत्र नाही की चिठ्ठीही नाही. एक वर्षाच्या प्रतीक्षेचं दु:ख इतकं मोठं आहे की त्यापेक्षा त्याना कुठंतरी मरण आलंय असं समजलं असतं तरी परवडलं असतं. (रडते.)

नानासाहेब : (थोपटत) तुझं बोलणं ऐकलं की काळीज फाटून जातं बेटा. पण मी तरी आता आणखी काय करू? गेले वर्षभर शोध घेतोय आपण त्यांचा. ह्या पंचक्रोशीतला एकही दगड हलवायचा बाकी ठेवला नाही. मुख्यमंत्र्यांपर्यंत अर्ज विनंत्या झाल्या. प्रत्येकजण सहानुभूती दाखवतो आणि गप्प बसतो.

(माधुरीची छोटी मुलगी निवेदिता बाहेरून धावत येते.)

निवेदिता : आजोबा-आजोबा, संध्याकाळी तुम्ही माझ्यासोबत खेळायला येणार होतात ना?

नानासाहेब : (तिला उचलून घेत) आज मला जरा काम होतं बेटा.

निवेदिता : रोजच तुमचं काम असतं. आम्ही नाही तुमच्याशी बोलणार जा!

(पळत माधुरीकडे जाते. तिच्या डोळ्यात पाणी बघून.) आई तू का रडतेस?

माधुरी : (गप्पच.)

निवेदिता : (आजीकडे पहात.) आजी, आई का रडतेय?

सुभद्राबाई : कांदा कापत होती म्हणून डोळ्यातून पाणी आलं तिच्या.

निवेदिता : मला फसवू नको. मला सगळं काही माहीत आहे.

सुभद्राबाई : काय माहीत आहे?

निवेदिता : बाबा हरवलेत म्हणून आई रडतेय. होय ना आई? (माधुरी तिला जवळ घेते.) आजोबा, तुम्ही का नाही शोधून आणत बाबाना?

सुभद्राबाई : (अस्वस्थ.) अहो तुम्ही असं का नाही करत?

नानासाहेब : काय करू?

सुभद्राबाई : गोटखिंडे भावोजीना सांगून त्यांच्या पेपरात जाहिरात का नाही देत पुन्हा?

नानासाहेब : किती वेळा द्यायची जाहिरात?

सुभद्राबाई : हो पण प्रयत्न तर चालू ठेवलेच पाहिजेत ना ?

नानासाहेब : ठीक तुझी मर्जी! (निवेदिताला जवळ घेऊन गोंजारू लागतात.)

(सकाळ. दै.सत्यप्रभाची पाटी दिसते. दहाबारा केसेसचे छोटेसे कार्यालय. कंपोझिटर्स,फोरमन, उप-संपादक यांची चाललेली लगबग गोटखिंडे आपल्या टेबलाशी बसून अग्रलेख लिहिताहेत.)

गोटखिंडे : (अचानक लक्ष जाऊन) अरे वा! या या नानासाहेब मी तुमचीच वाट पहात होतो. बसा.

नानासाहेब : का? काही विशेष बातमी?

गोटखिंडे : बातमी नंतर सांगतो. पण तुम्ही असे उदास का दिसताय ते सांगा आधी.

नानासाहेब : दुसरं काय असणार? जावईबापू बेपत्ता होऊन वर्ष होऊन गेलं. माधुरी तर

त्यांच्या आठवणींनी दिवसें दिवस हळवी होत चाललीय. त्यात तिला हल्ली एक स्वप्न पडतं. चार गुंड धावत येतात आणि जावईबापूंचा खून करतात.

गोटखिंडे : (मोठ्याने हसत) मन चिंती ते वैरी न चिंती. तिला म्हणावं. कशात तरी मन गुंतवून ठेव.

नानासाहेब : म्हणून तर तिला शाळेत नोकरी लावून दिली. पण मिळाला मोकळा वेळ की तिचं काळजी करणं झालं सुरु. त्यात सोबतीला तुझी वहिनी भेटलेय तिला. काल म्हणाली गोटखिंडे भावोजींकडे जाऊन जावईबापू हरवल्याची जाहिरात देऊन या पुन्हा.

गोटखिंडे : जाहिरात देऊन जर हरवलेली माणसं सापडली असती तर मग पोलिस खात्याला काय काम उरलं असतं?

नानासाहेब : तुझं बरोबर आहे रे, पण हे तिला कोण पटवून सांगणार? (उसासा सोडत) जाऊ दे. तू काय बातमी सांगणार होतास ती सांग बरं...

गोटखिंडे : आपला तो कॅप्टन चंद्रा सोनवणे माहीत आहे ना तुला?

नानासाहेब : हां, तो कारगिलच्या युद्धात वॉर मेडल मिळालेला ना ?

गोटखिंडे : हां,

नानासाहेब : त्याचं काय झालं ?

गोटखिंडे : निवृत्त होऊन आल्यावर शासनानं त्याला सोनईजवळची दहा एकर जमीन बक्षीस म्हणून दिली. आ.मोहितेंना त्या जमिनीवर कागद फॅक्टरी टाकायची म्हणून पाहिल्यापासून डोळा होता. ती जमीन बळकवायची म्हणून तो आता नाना खटपटी लटपटी करतायत. सोनवणेवर त्यानी प्रेशर आणलंय. त्याला रोज दमदाटी चालू आहे. माझ्याकडं सर्व पुरावा गोळा झालाय. उद्याच्या अंकात बार उडवून देतो.

(ठोऽऽ असा बंदुकीच्या बाराचा मोठा आवाज येतो. शहराबाहेरील सोनई नदीजवळची वस्ती. आ.मोहिते त्यांचा मुलगा सर्जेराव आणि इतर तिघेजण जीपमधून खाली उतरताहेत. तेवढ्यातल्या तेवढ्यात सर्जेरावाने बंदूकीने आभाळातले एक पाखरू टिपले. आवाजाने कॅप्टन सोनवणे बाहेर येतो. त्याच्या दोन्ही हातात कुबड्या. रक्तबंबाळ झालेलं पाखरू त्याच्या पायाशी पडतं आणि तेथेच प्राण सोडतं.

सोनवणे : रामराम आमदार साहेब.

आमदार : रामराम!

सोनवणे : कसं काय गरिबाकडं येणं केलंत ?

आमदार : मतदारसंघात संपर्क दौरा काढलाय. म्हटलं तुमची भेट घ्यावी. त्यात तुमी माजी सैनिक. देशाच्या रक्षणासाठी लढाईत पाय गमावलात तुमी. अभिमान वाटतो तुमचा आमाला.

सोनवणे : या ना, आत या (बहिणीला) बेबी... आमदारसाहेब आलेत बसायला घोंगडी घाल. (बेबी वाकून घोंगडी घालत असताना तिची वक्षस्थळं सर्जेरावाच्या नजरेत भरतात. तो अस्वस्थ होतो.)

सर्जेराव : (अभावितपणे बोलून जातो) वा छान !

आमदार : (चमकून त्याच्याकडे पहात) काय छान सर्जेराव ?

सर्जेराव : सोनवणे साहेबांचा फोटो मात्र अगदी छान आलाय बघा की जरा.

(सर्वजण भिंतीवर लावलेल्या सोनवणेच्या फोटोकडं पहातात. युनिफॉर्म मधला त्याचा रुबाबदार फोटो दिसतो. छातीवर चकचकीत मेडल लटकलेले दिसते.)

सोनवणे : काय विशेष काय काढलं ?

आमदार : आमी तुमाला पूर्वी कल्पना दिलेली होती. (सर्वजण बसतात. बेबी चुलीशी जाते.)

सोनवणे : कशाबद्दल म्हणताय?

आमदार : तुमची तेवढी ती जागा आमाला देऊन टाका. फार मनात भरलीय ती आमच्या.

सोनवणे : जागेचं सोडून दुसरं काहीही बोला आमदारसाहेब.

आमदार : पण त्यात तुमचं काय नुकसान होणार हाय? आन् तुम्ही सांगाल ती किंमत देतुयाच की आम्ही. कागद फॅक्टरीसाठी इक्ती आदर्श जागा शोधून मिळायची नाही.

सोनवणे : प्रश्न किमतीचा नाही साहेब.

आमदार : मग ?

सोनवणे : त्या जागेत मला मत्स्यशेती करायची आहे. सैन्यात असताना मी मत्स्यशेतीचे प्रयोग जवळून बघितलेत. शिवाय डायरेक्टर ऑफ फिशरीज् चं मला प्रोजेक्ट मंजूर झाल्याचं पत्रही आलांय.

आमदार : सोनवनेसाहेब. तुमच्या मत्स्यशेतीला आमचा इरोद नाय. पन मत्स्यशेती करायची ती वाया गेलेल्या जिमिनीवर. पाणथळ जिमिनीवरचा तो एक रामबाण उपाय हाय. पन त्यासाठी आशी सोन्यासारकी नदी जवळची जिमीन का म्हून वाया घालवताय तुमी?

सोनवणे : नदीचं म्हणाल तर मलाही चिा मोठा ॲडव्हाण्टेज मिळणार आहे. जिल्ह्यात एक प्रयोग करतोय मी तिच्यावर. शिवाय आमच्या लोकांना तिथं रोजगारही उपलब्ध होणार आहे.

आमदार : रोजगाराचं म्हनालं तर आमीबी तुमच्या लोकाना कामात प्रायॉरिटी देऊ. काय सर्जेराव?

सर्जेराव : हो की. शिवाय मत्स्यशेतीत जितकी मजुरी मिळंल त्यापेक्षा कितीतरी जास्त मजुरी आम्ही लोकाना देऊ शकतो...

सोनवणे : मी स्पष्ट सांगतो साहेब मला हे जमणार नाही.

सोनवणे : शिवाय शासनानं इनाम दिलेली जमीन विकता येत नाही हे माहिताय तुम्हाला.

आमदार : त्याची काळजी करू नका तुम्ही. शासनाचं माझ्याकडं लागलं.

सोनावणे : नाही...जमणार नाही.

आमदार : नीट इचार करून सांगा.

सोनवणे : (उठत) आमदारसाहेब मी नीट विचार करूनच बोलतोय. मी तुमच्या कागद फॅक्टरीसाठी कितीही किंमत घेऊन जमीन विकली तरी स्वत:च्या पायावर उभं रहाण्याचं समाधान मला मिळणार आहे का त्यामुळं ?

आमदार : (निरूत्तर)

सोनवणे : शिवाय आमच्या राजारामला मत्स्यपालनाच्या प्रशिक्षणासाठी पाठवला होता तोही नुकताच परत आलाय. आमच्या सर्व माणसाना मी या नव्या प्रयोगासाठी तयार केलंय. ट्रेनिंग दिलंय मलकत्याला मत्स्यबीजासाठी ऑर्डर नोंदवलेय. फक्त कामाला सुरूवात करायचीय बाकी राहिलेय.

आमदार : (उठत) तुमची मर्जी. तुमच्यासमोर फकस्त तुमच्या लोकांच्या इकासाचा इचार हाय. पन आमच्या समोर अख्या गावाच्या इकासाचा इचार हाय. पूर्ण देशाच्या इकासाचा इचार हाय. आन् देशाचा इकास करन्यासाठी येळ आली तर आमी आमच्या जीवाचीपन बाजी लावू. तुमाला हे परवडेल का? (सर्वजण उठतात)

सोनवणे : (हसत) सैन्यात गेलो त्या पहिल्या दिवशी जीवाची बाजी कशी लावायची ते शिकलो.

आमदार : सोनावनेसायेब ती लढाई येगळी आसते. तिचे नियम ह्या लढाईत उपेगी न्हाई पडत.

सोनवणे : म्हणजे तुम्ही आमच्याशी लढाई करायची असं ठरवूनच आलेले दिसताय.

आमदार : (हसत) काय पोरासारकं बोलताय सोनावनेसायेब. तुमच्याशी लढाई करायला काय खुळे झाले की काय आमी ? माशी मारायला बंदूक उचलत नसतो

आमी! चला रं... (जीप स्टार्ट झाल्याचा आवाज. बेबी भेदरून सोनवणेकडे पहाते. सोनवणे कुबड्यांवर भार तोलत पुढे होतो आणि थोपटून बेबीला धीर देतो.

तुळपुळे : (दत्तोबा तुळपुळे यांचे घर. घरापुढे अंगण. त्याला फाटक. दत्तोबांची पत्नी शांताबाई ओटीवरच तांदूळ निवडत बसल्या आहेत. दत्तोबा सतरंजीवर बसलेले आहेत. ते एका माशीच्या मागे लागत टाळी वाजवतात.) सापडली!

शांताबाई : (हसत.) अहो माशा काय मारत बसलाय नुसते.

तुळपुळे : मग काय करू? वेळ कसा जाणार?

शांताबाई : मी तांदूळ निवडतेय तोपर्यंत जरा पेपरतरी वाचून दाखवा की!

तुळपुळे : बरं...बरं...(मोठ्याने वाचतात) माजी सैनिकाची जमीन बळकावण्याचा आ.मोहिते यांचा प्रयत्न. कॅप्टन सोनवणे यांच्यावर मोहिते दबाव आणीत असून -

नानासाहेब : (त्यांचे वाक्य पूर्ण करीत) कॅप्टन सोनवणे त्यांच्या दबावाला बळी पडत नाही.

तुळपुळे : वा: वा: या नानासाहेब, तुम्हाला कसं माहीत हे प्रकरण?

नानासाहेब : (चप्पल काढत) अरे माझ्यासमोरच काल गोटखिंडेने बातमी लिहीली ती. नमस्कार वहिनी.

(शांताबाईकडे लक्ष जातं. शांताबाई पदर सावरून घेतात. किंचीतसं स्मीत करतात. अतिकष्टाने त्यांचा चेहेरा फिकट, निस्तेज दिसतो. त्या पुन्हा आपले लक्ष तांदूळ निवडण्यात घालतात.)

तुळपुळे : ये... बैस... काही विशेष?

नानासाहेब : विशेष काही नाही. बऱ्याच दिवसात आपली बैठक झाली नाही म्हणून म्हटलं एकदा तारीख पक्की करून टाकावी. गोटखिंडेला भेटलोय मी. रविवारी संध्याकाळी बसूया म्हणाला. म्हटलं तुला जमतंय की नाही ते पाहावं.

तुळपुळे : मला न जमायला मी काय लंडनचा हायकमिशनर वाटलो तुला ? अगदी मोकळा आहे मी. बोल कुठं भेटायचं?

नानासाहेब : इथंच भेटू या की. जागा ऐसपैस आहे तुझी. तुमची काही हरकत वहिनी?

शांताबाई : माझी कसली आलेय हरकत! ४२ च्या लढ्यात आख्खं घर क्रांतीकारकानी भरून गेलं होतं. तेव्हा घेतली नाही हरकत तर आता तुमच्या तिघांच्या बैठकीसाठी कशाला घेऊ! (खोकतात)

नानासाहेब : दत्तोबा तू काही म्हण पण वहिनी तुझ्यामागे खंबीरपणे उभ्या राहिल्या म्हणूनच चळवळीत टिकलास तू.

दत्तोबा : तिचंच कसलं कौतुक करतोहेस, स्वातंत्र्यसैनिकांच्या सर्व बायकानी हेच केलंय.

नानासाहेब : मला तर असं वाटतं की देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी आपल्यापेक्षा आपल्या बायकांचाच फार मोलाचा हातभार लागलाय.

दत्तोबा : एक दिवस आपण अशा सर्व महिलाना बोलावून त्यांचा मोठा सत्कार केला पाहिजे.

शांताबाई : किती खडे हे तांदळात !
(दोघेही शांताबाईंकडे पहातात आणि पुन्हा आपल्या गप्पात रमतात)

दत्तोबा : मघाशी ते आमदार मोहित्यांचं काय म्हणत होतास?

नानासाहेब : अरे हां, तो जमिनीसाठी सोनवणेच्या मागे लागलाय.

दत्तोबा : असं असेल तर एक माजी सैनिक या नात्यानं आपण सोनवणेला मदत केली पाहिजे.

नानासाहेब : म्हणजे काय करायचं?

दत्तोबा : आपण कलेक्टरला भेटून त्यांच्या कानावर घालू.

नानासाहेब : आपला हा कलेक्टर एक नंबरचा भ्रष्टाचारी माणूस तो काय करणार ?

शांताबाई : (तांदूळ निवडता निवडता) वाटोळं होऊ दे मेल्यांचं!

दत्तोबा : काय म्हणालीस?

शांताबाई : अहो ह्या तांदळात खडे किती आहेत बघा ना ! मेल्याना लाजा कशा वाटत नाहीत देव जाणे! सोन्यासारखा पैसा देऊन हे असलं पदरात घ्यायचं...

दत्तोबा : जाऊ दे तू संताप नको करून घेऊस. आपलं नशीब समजायचं आणि गप्प बसायचं...

शांताबाई : नशीब हे की तांदळात खडे आहेत - अजून खड्यातून तांदूळ यायला सुरूवात झालेली नाही. (सर्वजण मोठ्याने हसतात)

(गोटखिंडेंचे स्वयंपाकघर. त्यांची पत्नी वत्सलाबाई भाताच्या पातेल्यातून चमचाभर भात काढतात आणि त्यांच्या ताटात वाढतात.)

गोटखिंडे : अगं पुरे पुरे, किती वाढतेस.

वत्सलाबाई : घरच्या तांदळांचा भात आहे. बाधणार नाही तुम्हाला दोन घास जास्त खाल्ले तर.

गोटखिंडे : बाधायला काय धाड भरलेय मला. तुरूगात होतो तेव्हा कसल्यातरी घाणेरड्या आट्याची कांजी प्यायला मिळत होती. ती ही पचवलेय. आठवतंय

ना?

वत्सलाबाई : त्यावेळी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची नशा होती तुमच्या डोक्यात कांजीच काय पण अख्खा राक्षसही पचवला असतात. आता दोन घास वेळेवर मिळताहेत ते तरी स्वस्थपणे खा.

गोटखिंडे : (गंमत करत) संपादकाने नेहमी अस्वस्थपणे जेवायचे असते आणि अस्वस्थपणे जगायचे असते. कारण जनतेवर होणाऱ्या अन्यायाना आणि अत्याचाराना वाचा फोडण्याची जबाबदारी त्याचीच असते.

वत्सलाबाई : जेवा मुकाट्याने. अग्रलेख ऐकवू नका. आयुष्यभर तेच ऐकत आलेय. भाजी घालू थोडी?

गोटखिंडे : नको अगं खरंच नको.

वत्सला : संध्याकाळी भाजी आणायला बाजारात गेले होते तेव्हा तुळपुळे भावोंजीकडे गेले होते.

गोटखिंडे : काय म्हणत होता तो?

वत्सला : भावोजी नव्हते घरात. शांताबाई होत्या. प्रकृती पार खालावलेय त्यांची. सारख्या खोकत होत्या. मला तर बाई भीतीच वाटत होती त्यांच्या त्या खोकण्याची.

(बाहेरच्या खोलीत फोनची घंटी वाजते म्हणून वत्सलाबाई उठतात.)

वत्सलाबाई : मी पहाते कोण आहे ते.

(बाहेरच्या खोलीत येऊन फोन उचलतात.)

गोटखिंडे : (आतूनच) कोण आहे ?

वत्सलाबाई : (रिसीव्हरवर हात ठेऊन) आमदार मोहिते.

गोटखिंडे : (ओरडूनच सांगतात) त्याला सांग मी घरी नाही म्हणून.

(आमदार मोहितेंचा दिवाणखाना. ते फोन दणकन खाली आदळतात. दिवाणखान्यात त्यांचा मुलगा सर्जेराव. आमदारांच्या समोर व्हीस्कीचा ग्लास.)

सर्जेराव : काय झालं?

आमदार : त्यो गोटशिंड्या घरी न्हाय आसं त्याची बायको म्हनत व्हती.

सर्जेराव : गेला आसंल कुठंतरी बातमी काढायला.

आमदार : तुम्ही नुसतेच वाढलात पण आजून आक्कल आलेली न्हायी तुमाला... (पितो)

सर्जेराव : म्हंजे काय आबा?

आमदार : मी हंड्रेड पर्सेंट सांगतो, त्यो घरीच हाय आता.

सर्जेराव : मग फोनवर का येत नाही?

आमदार : आमदार मोहिते काय बोलनार हे माहिताय त्याला.

सर्जेराव : तरीपन तुम्ही त्याला फोन केलात...

आमदार : कोनत्याही गोष्टीसाठी शेवटपर्यंत ट्राय करून बघायची पद्धत हाय आपली.

सर्जेराव : त्याच्याकडं कसली ट्राय करताय!

आमदार : सोनवनेच्या प्रकरनाला त्यो जरा ज्यास्तच पब्लीशिटी देतोय.

सर्जेराव : मग तुमी सांगून ऐकनार हाय का त्यो?

आमदार : त्यो न्हाय ऐकायचा (पितो) म्या त्याला ल्हानपनापासनं वळखतोय. कारखान्याच्या जाहिराती फेकल्या की इतर संपादक कुत्र्यागत धावत येत्यात पर त्यो... न्हाय!

सर्जेराव : तुम्ही म्हनत असाल तर बंदोबस्त करतो.

आमदार : कायतरी बोंबलू नका. रोग रेड्याला आन् औषध पखाल्याला... ... पुढच्या वर्षी नगराध्यक्ष व्हायचय ना तुम्हाला? बोलताना जरा इचार करून बोलत चला. त्या गोटखिंड्याशी आपलं काहीएक वैर न्हाई. आपल्याला फकस्त हवी ती सोनवणेची जमीन. काय वाट्टेल ते झालं तरी (पितो)

(सोनवणेचे घर. शेवटचा घोट घेऊन तो चहाचा कप खाली ठेवतोय. तिथे फक्त बेबी)

सोनवणे : काय वाट्टेल ते झालं तरी जमीन मी मोहितेला विकणार नाही.

बेबी : दादा मला भीती वाटतेय त्याची.

सोनवणे : आपण काय चोरी केलेय काय त्याची? का तो मोठा वाघ लागून गेलाय? मी बॉंर्डवर होतो तेव्हा बाबा वारले पण त्यांच्या मागं तू आणि आई धीरानं जगलातच ना? मग आता मी इथं असताना तू त्याला का घाबरतेस?

बेबी : परवा भाषा चांगली नव्हती त्याची... धमकी देऊन गेला.

सोनवणे : पण आपण भिक घातली का त्याच्या धमकीला?

बेबी : आपलं सोडून दे पण उद्या तो आपली माणसं फोडील. त्यांना लालूच दाखवील, धाक-दपटशा दाखवील. तू सुशिक्षित आहेस. जग बघितलंयस. पण हे गाव हेच इथल्या माणसांचं जग. त्याना गावाला घाबरून राहावं लागतं. (आता तो भाषण करतोय. त्या वस्तीवरी स्त्री-पुरूष मुले दाटीवाटीने

त्याच्यासमोर बसलेली आहेत. सोनवणेच्या बाजूला बेबी आणि राजारामही दिसतात. सोनावणे बोलता-बोलता कुबड्यावरून फिरत असतो.)

सोनवणे : गावाला घाबरून राहण्याचं काहीएक कारण नाही. या देशातल्या प्रत्येक माणसाला कायद्याने संरक्षण दिलेले आहे आणि कायद्यासमोर सर्वजण समान असतात मग तो आमदार मोहिते असो किंवा कॅप्टन चंद्रा सोनावणे! आपल्याला आपल्या जागेत स्वत:चा धंदा सुरू करायचाय मग त्यासाठी घाबरायचं कुणाला? मला सरकारनं बक्षीस म्हणून दिलेली जमीन मी या मत्स्यशेतीच्या प्रकल्पासाठी दिलेली आहे. त्यात माझा काहीही स्वार्थ नाही. स्वार्थ जर असलाच तर तो आपण सर्वजणांनी संघटित होण्याचा आणि स्वत:च्या पायावर उभं राहून स्वाभिमानानं जगण्याचा! लाचारीपणा, गुलामगिरीच्या सनातन पिंजऱ्यातून बाहेर पडून स्वाभिमानाच्या मुक्त मोकळ्या आकाशत भरारी मारण्याची ही संधी हातची घालवायचीय का तुम्हाला?

1 : पन तुमच्या त्या मत्स्यशेतीतलं आमाला काहीच म्हायत नाय.

सोनावणे : तुम्हाला माहिती नाही म्हणूनच तर ह्या राजारामला ट्रेनिंगसाठी पाठवला होता. तो माहिती करून देईल तुम्हाला सर्व.

2 : पर आमाला जमलं त्ये? न्हाई म्हंजे येकदम येगळा धंदा असल्यामुळं इचारतोय मी...

सोनवणे : का नाही जमणार? यापूर्वी कधी कागदाच्या फॅक्टरीत काम केलं होतं तुम्ही? कागद कसा तयार होतो त्यासाठी काय काम करावं लागतं हे कधी बघितलंय तुम्ही? मग कागदाच्या फॅक्टरीत काम करायला तुमची तयारी कशी? हे सुद्धा काम तुम्हा सर्वांना हळूहळू येईल, पाण्यात पडलं की बरोबर पोहता येतं.

3 : पन म्या म्हंतो आपुन त्या जिमिनीवर ऊस का लावू नये?

सोनवणे : हे बघा बंधूनो तुम्ही एकदा का ऊस लावलात की भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या चक्रात अडकलात म्हणून समजा. तुम्हाला ऊसाच्या बियाणापासून ते ऊसाला भाव मिळवून देण्यापर्यंत कारखान्यावरच अवलंबून रहावे लागेल. चेअरमनच्या इशाऱ्यावर नाचावे लागेल. आणि अशाही परिस्थितीत त्याने भाव पाडून दिला तर काय करणार तुम्ही? त्याच्या उलट नेमकं ह्या माश्यांचं आहे. पडेल तो भाव देऊन लोक मासे खरेदी करतात. आता आपलीही जी दहा एकर जमीन आहे तिच्यातील एका एकरात पहिल्यांदा हा उद्योग सुरू करायचा. तलाव खोदण्यासाठी दहा हजार आणि

इतर भांडवल २१ हजार मिळून सुरूवातीला ३१ हजार रूपये खर्च येईल. माझ्याकडे काही पैसे आहेत शिवाय बँका कर्ज द्यायला तयार आहेत. एका एकरात वर्षाला सरासरी चार टन मासे तयार होतात. अगदी १२ रूपये किलो हा भाव धरला तरी वर्षाला ४८ हजार रूपये होतात. त्यात निव्वळ नफा होतो ३५ हजार रूपयांचा. उद्या आपण दहा एकरांवर बारा तलाव घेतले आणि रोटेशन पद्धतीने मासे वाढवले तर वर्षभर दरमहिन्याला आपल्याला ३५ ते ४० हजाराचा म्हणजे वर्षाला ४ लाख ८० हजाराचा नफा मिळणार आहे. दोन वेळची भाकरी सुखासमाधानानं आणि स्वाभिमानानं खाता येणार आहे. आणि तो आमदार मोहिते ही भाकरी तुमच्या तोंडातून काढून घेण्यासाठी टपलाय. त्या राक्षसाला साथ देणार का तुम्ही?

(सर्वजण नाही म्हणताहेत त्यांचे उजळून गेलेले चेहेरे नानासाहेबांच्या चेहेऱ्यावर डिझॉल्व होतात.)

(नानासाहेब झोपण्यापूर्वी पलंगावर बसून आपल्या नातीला गोष्ट सांगताहेत.)

नानासाहेब : एक खूप मोठ्ठा राक्षस होता. त्याचं नाव बकासूर. त्याला रोज गाडाभर अन्न आणि एक माणूस खाण्यासाठी लागत असे.

निवेदिता : अय्या, राक्षस माणसाना खातो?

नानासाहेब : नुसताच खात नाही तर कोवळ्या काकडीसारखा कचाकचा चावून खातो.

निवेदिता : (डोळ्यावर हात) पुढे काय होतं त्या बकासूराचं?

नानासाहेब : त्याच्या उपद्रवाला कंटाळून गावातल्या लोकांनी रोज एका घरातला माणूस आणि गाडाभर अन्न त्याला द्यायचं असं ठरवलेलं असतं. त्या दिवशी ज्या घराची पाळी असते त्या घरात पांडवानी वस्ती केलेली असते.

निवेदिता : आणि मग भीम त्या बकासूराला बुक्के मारुन मारून यमसदनाला पाठवतो...

नानासाहेब : अगं लब्बाडे – तुला माहीत होती वाटतं गोष्ट !

निवेदिता : होऽऽऽ आम्हाला बाईनी वर्गात सांगितली होती.

नानासाहेब : मग मला आधीच का नाही सांगितलंस?

निवेदिता : म्हटलं तुमची जरा फिरकी ताणावी!

नानासाहेब : (हसत) काय गं ए भवाने आजोबांची फिरकी ताणतेस होय ?

निवेदिता : कारण माझे आजोबा मला खूप खूप आवडतात.

(नानासाहेब निवेदिताला कुशीत घेतात. निवेदिता त्याना बिलगून विचारते.)

निवेदिता : आजोबा, आजोबा राक्षस कसा असतो हो?

(आमदार मोहित्यांच्या संतप्त चेहेऱ्याचा क्लोजअप्–त्यांच्या पोल्ट्रीफार्म मधील एका सेक्टरमधील सर्व कोंबड्या मरून पडल्यात आणि तिथल्या एका मजुराला ते चाबकाने झोडपताहेत.)

आमदार : हरामखोर. मस्ती आली का काय साल्या तुला.

मजूर : माफ करा मालक. गरिबाला मारू नका मालक.

आमदार : (आणखीन फटकावत) मारू नका काय! आणि मग आमचं हे झालेलं नुसकान भरून द्यायला काय तुजा बा येनार हाय व्हय?

मजूर : माज्या हातनं चूक झाली मालक पुन्यांदा आसं नाय व्हनार. तुमच्या गळ्याची आन मालक. पाय धरतो पन मला मारू नगसा मालक.

(आमदाराच्या पायावर पडतो. आमदार हातातला चाबूक फेकून देतात आणि संतापाने थरथरत...)

आमदार : पोल्ट्रीफार्म उभा करन्यासाठी आमी आमचं रक्त आटवलंय. रात्रंदिवस म्हेनत केलेय.

मजूर : रातीला वावटळ आली मालक. लय मोटं वादळ झालं. त्यात लाईट गेली आन् समदी पाखरं मेली... माजा त्यात काय बी दोस न्हाय मालक.

(आमदार पिंजऱ्याकडे बघतात सर्व पिल्ले मरून पडलेली. पण मोठ्या कोंबड्यामात्र सुरक्षित असतात.)

आमदार : ठीक. आता ह्या बाकीच्या समद्या कोंबड्यांवर नीट ध्यान ठीव नायतं कोंबडीगतच फाडून खाईन तुला.

(सर्जेराव कोंबडीची तंगडी खातोय. तो आणि त्याचे तीन-चार साथीदार एका हॉटेलमध्ये बसून खाण्यापिण्यात दंग झालेत. पार्श्वभूमीवर वेस्टर्न म्युझिक...)

1 : काय झालं मग सर्जेराव?

सर्जेराव : कसलं काय झालं?

1 : कागद फॅक्टरीचं कुठवर आलं?

सर्जेराव : सर्व काही व्येवस्थित झालं होतं...

2 : मग घोडं कुठं पेंड खातंय आता?

सर्जेराव : सोनवणे जमीन विकायची नाही असा हट्ट धरून बसलाय.

3 : तुमी म्हणत आसाल तर त्याचा बंदोबस्त करून टाकू

सर्जेराव : इचार करून पावलं उचलायला हवीत. घाई करून समदा इस्कोट व्हईल.

1 : आता कसला इचार करताय?

सर्जेराव : दै.सत्यप्रभांचा संपादक गोटखिंड्या. त्यानं ह्या प्रकरणाला जरा जास्तीच पब्लीशिटी दिलीय.

1 : तुम उसकी फिकीर मत करो. आप अगर कहेंगे तो उसका हाथ निकाल देता हूं. बातम्या लिवण्याचं काम आपोआप बंद पडंल त्याचं (हसतो)

सर्जेराव : त्याचा हात काढून काय फायदा? आपलं वैर गोटखिंड्याशी नाही.

2 : फिर क्या करने का बॉस... तूम सिर्फ बोलो.

सर्जेराव : सोनवणे जमीन विकायला तयार होईल असं काहीतरी करावं लागेल. (बेबीची वक्षस्थळं सर्जेरावाच्या नजरेसमोर येतात.) त्याची ती बहीण... लवंगी मिर्ची साली... परवा कशी बघत होती उसकी याद है ना?

3 : आयडिया बॉस...

सर्जेराव : क्या?

3 : उसके बहेन को हम भगाएंगे और उसके बदले मे जमीन बेचने के लिए मजबूर करेंगे.

सर्जेराव : आयडिया चांगली हाय, पण...

1 : पन काय?

सर्जेराव : बाईच्या बाबतीत सालं आपलं लक न्हाय. मागं एकदा अशीच घाई केली आणि त्या नानासाहेबांच्या पोरीनं माधुरीनं सर्वांसमक्ष मला...(जोड्यानं मारलं)

2 : जाने दो यार, उसकी याद मत निकालना. उसको तो हमने काफी सजा दे दी है...

सर्जेराव : (इकडे तिकडे पहातो.) जादा बकबक करू नकोस. नाहीतर जबान निकाल के हाथ मे दे दुंगा...

2 : सॉरी बॉस.

सर्जेराव : (गाल चोळत) कुछ बी बोलो, मगर वो याद मुझे बहुत सताती है. जोपर्यंत सालीला आडवी घालत नाय तोपर्यंत साला आपला दिल ठंडा नही होगा...

1 : मगर जरा संभल के बॉस. तिचा बाप स्वातंत्र्यसैनिक हाय. शिवाय तो तुळपुळे आणि गोटाखिंडे यांच्या गँगचा बॉस हाय.

सर्जेराव : कोण घाबरतय सालं त्या थेरड्याला...

(तुळपुळेंचे घर. गोटखिंडे, तुळपुळे आणि नानासाहेब गप्पा मारत बसलेत.)

नानासाहेब : ४२ च्या लढ्यात आपलं नुसतं नाव घेतलं तरी ब्रिटीश थरथरा कापायचे.

तुळपुळे : आणि विशेष म्हणजे आपल्याकडं शस्त्रं काहीच नव्हती.

नानासाहेब : काहीच नव्हती असं कसं ? बापूजींनी दिलेलं अहिंसेचं शस्त्र होतं की! इतकं पावरफुल की त्या समोर अणुबॉम्बही निष्प्रभ ठरावा!

गोरखिंड : पण सध्या आता मात्र अणुबॉम्बचेच दिवस आलेले आहेत हे विसरता कामा नये आपण.

नानासाहेब : अशावेळीच उलट अहिंसेच्या शस्त्राला अधिक धार चढत असते...

तुळपुळे : कोण विचारतंय तुमच्या त्या अहिंसेच्या शस्त्राला हल्ली? हिंसा, अत्याचार, अन्याय याच्या बातम्या वाचल्याशिवाय एक दिवस तरी जातोय काय, काय हो संपादक ?

गोटखिंडे : हो पण असल्या बातम्या छापायची आम्हाला काही हौस नाही. बापुजींच्या विचारांनी भारावून जाऊन सर्वांगीण विकासाचं एक प्रभावी व्यासपीठ म्हणून मी वृत्तपत्र सुरू केलं.

तुळपुळे : पण आज ते सर्वांगीण भकासाचेच पत्र झालेय का नाही? (सर्वजण हसतात)

नानासाहेब : आपण हसतोय पण ही परिस्थिती बदलण्यासाठी काहीतरी केलं पाहिजे. समाजाचं भलं होईल असं काहीतरी केलं पाहिजे...

गोटखिंडे : समाजाचं भलं करण्याचा ठेका घेतलेली मंडळी तिकडं सचिवालयात बसलेत की.

तुळपुळे : पण त्याना स्वत:चं भलं करायच्या धांदलीत समाजाचं भलं करायला वेळ कुठं मिळतोय? (पुन्हा हसतात)

नानासाहेब : हेच खरं आपल्याला आव्हान आहे असं समजू आपण.

शांताबाई : (शांताबाई सरबत घेऊन येतात) आता कसली आव्हानं स्वीकारताय अजून ? गेल्या पंधरा दिवसात रेशनवर साखर नाही तेवढी मिळवलीत तरी खूप झालं.

नानासाहेब : (सर्वजण सरबत घेतात.) शांताबाई म्हणताहेत ते खरं आहे. रेशनवर साखर नाही. पोष्टात कार्ड शिल्लक नाहीत, कंडक्टरकडे चिल्लर नाही, अधिकाऱ्यांकडे वेळ नाही, शिक्षकांकडे अक्कल नाही आणि मुख्य म्हणजे सगळ्यांकडची माणुसकी संपत चाललीय. माणुसकी पूर्णपणे संपली तर माणसात आणि जनावरात काय फरक राहिला ? निदान माणूसकी जिवंत राहावी म्हणून तरी लढा उभा करणार की नाही आपण ?

गोटखिंडे : पण या लढ्यात तुमच्याबरोबर येणार कोण ? आमदार मोहित्यासारखे लोकप्रतिनिधी ? की झारीतील शुक्राचार्याची भूमिका वठवणारे अधिकारी ? विकासाची गंगा सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचू द्यायची नाही असं ठरवलंय

सर्वांनी.

नानासाहेब : हे जरी खरं असलं तरी समाजात काही चांगली माणसंसुद्धा असतात. काही अधिकारीही चांगले असतात. ते आपल्या बाजूनं उभे राहतील.

तुळपुळे : (हसत) चांगले अधिकारी ? आपल्या जिल्ह्यात एक तरी चांगला अधिकारी दाखवता येईल का तुला ?

नानासाहेब : (नानासाहेबांचे घर. सकाळ. त्यांची पूजा झालेय. बापूजींच्या फोटोला नमस्कार करतात आणि ओटीवर येऊन बसतात. समोरचा पेपर उचलतात. एक बातमी त्यांचे लक्ष वेधून घेते. बातमी वाचता वाचता त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव निर्माण होतात आणि लागलीच ते घरातील सर्व माणसांना बोलवतात.) अहो ऐकलं का, माधुरी, निवेदिता... सर्वजणी बाहेर या पाहू.

सर्व : (सर्वजणी बाहेर येता) काय झालं - काय झालं ?

नानासाहेब : या इकडे सर्वजणी माझ्या बाजूला नीट बसा पाहू...

नानासाहेब : (सर्वजणी बसतात) मी तुम्हाला आजवर नेहमी सांगत आलो ना, की कर्तृत्वाच्या दृष्टीने मुलगा आणि मुलगी यात काहीच फरक नसतो म्हणून.

सुभद्राबाई : बरं मग त्याचं काय?

नानासाहेब : ही बातमी बघा. आपल्या जिल्ह्याला एक तरूण आणि तडफदार महिला कलेक्टर मिळालेली आहे. (वाचून दाखवत.) श्रीमती शुभांगी बापट आयएएस यांची जिल्हाधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून यापूर्वी एक धाडसी आणि बाणेदार जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी लौकिक मिळवलेला आहे. जिल्ह्यात प्रथमच एका महिला जिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक होत असून त्यांच्या कारकिर्दीस दै.'सत्यप्रभा'च्या हार्दिक शुभेच्छा !

सुभद्राबाई : (फोटो पहात) खरंच की हो. अगदी लहान मुलगी दिसतेय. एवढ्या लहान वयात असं मानाचं पद म्हणजे फारच हुशार असणार...

नानासाहेब : (निवेदिताला) तू सुद्धा मोठी झाल्यावर अशीच कलेक्टर हो बरे का.

निवेदिता : म्हणजे रोज मला लालगाडीच्या दिव्यातून ऐटीत फिरता येईल ना? (सर्व हसतात.)

(टॉप अँगल वाइड शॉट. एक लाल दिव्याची गाडी चौकातून झोकदार वळण घेते आणि कलेक्टर कचेरीच्या प्रशस्त कमानीतून आत येते. गाडी थांबते.)

शिर्के : (आर.डी.सी. झटकन दरवाजा उघडतात.) वेलकम मॅडम, आयॅम आरडीसी शिर्के.

शुभांगी : थँक्यू. (असे म्हणत रूबाबात ठक् ठक् करीत चालायला लागतात. लांब कॉरीडॉरमधून त्या तशा चालत येत असतानाच त्यांचा स्मार्टनेस व बेडरपणा प्रत्ययास येतो. एका बाजूला काही अधिकारी नम्रपणे हातात फायली घेऊन उभे आहेत. नजरेत कौतुक. त्यांच्याकडे न पाहता झपाझप बाई पुढे येतात. चेंबरशी आल्यावर शिपाई दरवाजा उघडतो. त्या आत जाणार इतक्यात त्यांचे लक्ष खालच्या ग्राऊंडवर असणाऱ्या एका झाडाजवळ जाते. तेथे एक वृद्ध माणूस बसलाय आणि बाईंकडेच टक लावून बघतोय. डोळ्यात तेवढे प्राण शिल्लक. शरीराने पिचलेला आणि मनाने खंगलेला तो वृद्ध तिथूनच हात जोडून बाईंना नमस्कार करतो. ते पाहिल्यावर क्षणार्धात त्या आपला मोर्चा त्या वृद्धाकडे वळवतात. त्यांच्या पाठोपाठ आर.डी.सी. बाई त्या माणसाला हाताला धरुन वर उठवतात.)

शुभांगी : कोण बाबा तुम्ही ? इथं बसून काय करताय ?

वृद्ध : आठ दिवसांपासून इथं बसलोय बाई... कलेक्टरसाहेबांना भेटायचय... पण मला कोणी दादच लागून देत नाही.

शुभांगी : मीच कलेक्टर आहे बाबा. काय काम होतं तुमचं ?

वृद्ध : (हात जोडत) मी एक गरीब स्वातंत्र्यसैनिक आहे बाई. माझ्या पेन्शनचं प्रकरण तुमच्या कचेरीत रखडत पडलय त्यासाठी महिनोन् महिने खेटा मारतोय पण कोण मला मदत करायला पुढे येत नाही.

शुभांगी : ठीक आहे. मी पहाते तुमचं काम. या माझ्याबरोबर. (बाई त्या वृद्धाला घेऊन आपल्या चेंबरमध्ये येतात. आपल्या समोर बसवतात. आर.डी.सी. नम्रपणे उभेच)

शुभांगी : काय नाव तुमचं ?

वृद्ध : मी लक्ष्मण बाबाजी वाघमारे, राहणार बोरगाव, उमर वर्षे ७६. ४७ सालच्या लढ्यात मी पकडला गेलो... (त्याला पुढे बोलता येत नाही. ढास लागते म्हणून बाई आपल्या समोरचे पाण्याचे ग्लास त्याच्या हातात देतात. तो घटाघटा पाणी पिऊन ग्लास खाली ठेवत) तेव्हा मला डोंगरीच्या तुरुंगात ठेवले होते. माझा एक मुलगा होता तो मुंबईच्या मिलमध्ये कामाला होता. एक

दिवस मशीनमध्ये  अडकून मेला. मला कुणाचाच आधार नाही, बाईसाहेब म्हणून मी स्वातंत्र्यसैनिकाच्या पेन्शनसाठी अर्ज केला पण (आर.डी.सी.कडे पहात) साहेब म्हणतात की तुमचे कागद सापडत नाहीत म्हणून.

शुभांगी : ठीक आहे. तुम्ही बसा निवांतपणे (आर.डी.सी) हू इज डिलिंग विथ दोज केसेस ?

शिर्के : मायसेल्फ मॅडम.

शुभांगी : देन व्हाटीज द मॅटर ?

शिर्के : हिज केस इज बिइंग पेन्डींग सीन्स हीज रेकॉर्ड हॅन नॉट बीन ट्रेस्ड

शुभांगी : हॅव यू एव्हर बीन ट्राईड टू ट्रेस इट ?

शिर्के : येस मॅडम, वुइ हॅव ऑलरेडी सेन्ड अ लेटर टू द सुपरिनटेंडेन्ट ऑफ डोंगरी जेल बट इन दॅट केस वि हॅव गॉट नो रिस्पॉन्स.

शुभांगी : ॲन्ड इज् दॅट ऑल ?

शिर्के : मॅडम.

शुभांगी : शो मी हाऊ मेनी रिमांयडर्स यू हॅव सेन्ड ॲन्ड व्हॉट अदर थिंग्ज हॅव डन टू पर्सू धीस केस. यू कूड हॅव पर्सनली मीट द सुपरिनटेन्डन्ट.

शिर्के : मॅडम.

शुभांगी : इज नॉट देअर एनीवन टू सर्टिफाय दॅट ही वॉज ॲक्टिव्हली पार्टिसीपेटेड इन द फ्रिडम मूव्हमेंट ?

शिर्के : येस मॅडम् हीज केस इज ऑलरेडी सर्टिफाईड बाय रिनोन फ्रिडम फायटर हिंदूराव पाटील बट...

शुभांगी : वॉट बट?

शिर्के : बट हिज ॲक्च्युअल रेकॉर्ड हॅज नॉट बीन ट्रेस्ड. वि कॅन हेल्प हिम वोनली आफ्टर दॅट रेकॉर्ड इज ट्रेस्ड.

शुभांगी : कान्ट यू सी दॅट धीस फेलो हॅज सफर्ड अ लॉट ? सी हीज फेस ॲन्ड यू विल फाइंड द रेकॉर्ड ऑन हिज फेस...

शिर्के : बट मॅडम

शुभांगी : आय डोंट वॉट यूवर बट्स ॲन्ड इफ्स. पूटप हिज केस इमिजिएटली, गेट द टेंपररी सॅंक्शन फ्रॉम मी ॲन्ड गीव्ह हिम ऑल हिज ॲरिअर्स राईट नाऊ इन कॅश, कॉल द ट्रेझरी ऑफिसर, आय विल टॉक टू द सेक्रेटरी. (फोन उचलून स्टेनोला) गेट मी सेक्रेटरी जी.ए.डी. इन मंत्रालय एमिजिएटली.

(आर.डी.सी. जातात आणि तेव्हढ्यात आ.मोहिते पाटील हातात पुष्पहार

घेऊन आत येतात.)

आमदार : नमस्ते बाई-आमी आमदार मोहिते. तुमचं स्वागत करण्यासाठी आलो. तुमी आमच्या जिल्ह्यात आलात. आमाला फार आनंद झाला... हे घ्या !
(बाई हार हातात घेऊन टेबलावर ठेवतात)

शुभांगी : धन्यवाद !

आमदार : खरं म्हंजे आज आमी दिल्लीला जाणार व्हतो पन तुमच्या स्वागतासाटी प्लेनचं तिकीट कॅन्सल केलं. म्हनलं एक चान्स घ्यावा.

शुभांगी : चान्स ?

आमदार : चान्स म्हंजे हेच की तुमाला भेटावं. चार गोष्टी सांगाव्या... तसं काय घाबरण्याचं काम न्हाई बाई. तुमी आगदी निर्धास्त ऱ्हा इथं. आमी तुमच्या मागं खंबीरपनानं उभं ऱ्हाऊ.

शुभांगी : तुमच्या भावनांबद्दल आभारी आहे. पण मला कधी कुणाच्या आधाराची गरज लागेल असं वाटत नाही.

आमदार : बाई तुमी खूप शिकलेल्या हात आणि तुमच्या हातात पावरपन खूप हाये. पन येळ काय कदी सांगून येत न्हाई. आयुष्याचा लपंडाव खेळता खेळता केस पिकले आमचे. त्या आधारावर बोलतोय...

शुभांगी : म्हणजे ?

आमदार : गेल्या पंधरा वर्षात दहा कलेक्टर झाले पण आमच्याशिवाय पान हलत नाही कुणाचं. गेली पंधरा वर्षे आमी आमदार आहोत. लोकांचा ईश्वास संपादन करण्यासाठी फार मेहनत करावी लागली बाई. तरीपन काही समाजकंटक असे असतात की ते इथं येऊन आमच्याविषयी तुमाला काही बरं वाइट सांगतील...

शुभांगी : आमदारसाहेब दुसऱ्याचं ऐकून मी कधीही माझी मतं बनवीत नाही. माझे निर्णय मी स्वत:च घेत असते, तुम्ही काळजी करू नका.
(फोन वाजतो)

शुभांगी : (फोनवर) सर शुभांगी बापट स्पीकिंग-येस सर...वन मिस्टर लक्ष्मण बाबाजी वाघमारे इज ट्राइंग हार्ड फॉर हिज फ्रीडम पेन्शन हिज केस इज पेडिंग फॉर लॉंग टाइम. ही वॉज इन डोंगरी जेल ॲन्ड हिज रेकॉर्ड इज नॉट ट्रेस्. येस सर... येस...येस सर... थँक्यू सर थँक्यू व्हेरीमच सर... (ठेवते) (इंटरकॉम उचलून एक नंबरचे बटन दाबते) मिस्टर शिर्के मी सचिव साहेबांशी बोलले. तुम्ही बिल घेऊन या मी सही करते.

आमदार : बाईसाहेब तुमची निर्णय घेन्याची पद्धत आवडली आमाला. आशेच निर्णय घेत चला. कधी काही गरज पडली तर नुसता फोन करा...रात्री बेरात्री कधीही...धावत येऊ...एकदा आपलं मानूस म्हटलं की आमी त्याच्यासाठी जीवाचीपन बाजी लावतो...आनखी एक इनंती व्हती.

शुभांगी : (त्याला थांबवत) एक मिनिट हं.

पाटील : नमस्ते मॅडम मी ट्रेझरी ऑफिसर पाटील ऑफिसर

शुभांगी : नमस्ते.

(आर.डी.सी.आणि ट्रेझरी ऑफिसर समोर. आर.डी.सी.हातातील फाईल बाईंसमोर ठेवतात. त्या फायलीवर शेरा मारतात.

शुभांगी : पाटील...

पाटील : येस मॅडम

शुभांगी : यांना नीट तुमच्या कचेरीत न्या. त्यांच्या कागदपत्रावर सह्या घेऊन काय ती पूर्तता करा, आजच्या आज पैसे द्या आणि मला तसा रिपोर्ट द्या.

पाटील : येस मॅडम (ते दोघे जातात)

शुभांगी : हं काय म्हणत होतात तुम्ही? कसली विनंती ?

आमदार : इनंती म्हंजे तशी काही इशेष न्हाई पन येळात येळ काडून गरीबाकडं च्याला या. आमचं राज्य बी फिरुन दावतो तुमास्नी. आमच्या मळ्यावर येकदा याल तं हलावसं वाटनार न्हाई.

शुभांगी : (आमदारांना) ठीक आहे, या तुम्ही... (ते जातात. ती एस.पी.ना फोन लावते.)

ढोलकी वाजते. सर्जेराव आमदारांचा डोळा चुकवून मळ्यावर आलाय. सोबत त्याचे साथीदार. ते सर्वजण बैठकीत बसून पिताहेत. समोर बिजली नाचतेय.

आज चांदण्याची रात
घेई हातामधी हात
उभ्या देहाची कळी बघ खुलली
तुझ्यासाठी रातराणी फुलली...

घाल हळूच फुंकर
टाक मालवून दिवा
दडे पदराच्या आड चांद चवथीचा नवा

नव्या नवतीची रित खुळी लाजे अंधारात
धुंद पानाआड कळी कशी चळली...
(सगळे वा-वा-करीत दाद देतात. पागल झालेले. सर्जेराव बिजलीला जवळ घेतो.)

शुभांगी : एस.पी.साहेब
एस.पी. : येस मॅडम
शुभांगी : मला आमदार मोहित्यांविषयी संपूर्ण माहिती असणारी फाईल हवी आहे.
एस.पी. : येस मॅडम
शुभांगी : आणि एक लक्षात ठेवा
एस.पी. : येस मॅडम
शुभांगी : मला त्यांच्याविषयीची खरी माहिती हवी आहे.
एस.पी. : येस मॅडम...आयॅम द मोस्ट ओबेडियन्ट गव्हर्नमेंट सर्व्हंट.
शुभांगी : ओ.के. (फोन ठेवत) मला मळ्यावर बोलवतोय आमदार ! बघतेच एकदा तुझा मळा!

(बँकेचे ऑफिस. मॅनेजरच्या समोर सोनावणे. त्याच्या शेजारी राजाराम)
बँक मॅनेजर : ही तुमची फाईल (देतो) मी सर्व कागदपत्र नीट वाचलीत. प्रोजेक्ट रिपोर्ट फारच छान दिलाय तुम्ही. जनरली लोक कर्ज मागायला येतात तेव्हा तेव्हा कागदपत्रांची पूर्तता नीट करीत नाहीत. पण तुमच्या प्रकरणात मात्र नाव ठेवायला जागा नाही. अभिनंदन तुमचं!
सोनावणे : थँक्यू. पण कर्जाचं काय?
बँक मॅनेजर : तुमचं पन्नास हजार रूपयाचं कर्ज मंजूर.
सोनावणे : थँक्यू... सो काईंड ऑफ यू.
बँक मॅनेजर : दहा तारखेला येऊन चेक घेऊन जा. अहो तुम्ही देशासाठी जीव धोक्यात घालून लढलात. तुमच्यासारख्या माणसांची सेवा करायची संधी मिळावी हेच आम्ही आमचं भाग्यच समजतो.
सोनावणे : खरंच तुमचे आभार कोणत्या शब्दात मानावे तेच समजत नाही.
बँक मॅनेजर : कसल्या फॉर्मालिटीज पाळताय सोनावणेसाहेब...दोन-तीन कामं मात्र तुम्हाला करावी लागतील...

सोनावणे : कोणती ?

बँक मॅनेजर : म्हणजे असं बघा की आम्ही नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवळ संगीत-नृत्य ट्रस्ट चालवतो. गोरगरीब आणि उपेक्षित कलावंतांना संधी देणारा या प्रकारचा महाराष्ट्रातील हा एकमेव ट्रस्ट आहे. आम्ही तुम्हाला त्यांच आजीव सदस्य करून घेणार. त्याची फी आहे २५०० रूपये. मागच्या महिन्यात अध्यक्षसाहेबांनी मिटींग घेऊन एक अकस्मात निधी उभा करायचा ठरवलं आहे. आयत्या वेळी नैसर्गिक संकट आलेल्या गोरगरीबांना मदत करणे हा ह्या निधीचा मुख्य हेतू आहे. त्यासाठी आम्ही तुमच्याकडून ५००० रुपये देणगी म्हणून घेणार. आणखी एक गोष्ट...म्हणजे तसं मला व्यक्तिश: कमिशन घेणे हा प्रकार आवडत नाही. आयॅम डेडली अगेन्स्ट ऑफ दॅट काइंड ऑफ एकप्लॉयटेशन. पण काय असतं अनेकदा अशा मोठ्या संस्थांमध्ये हे नाईलाजानं करावं लागतं. नाहीतर मग मंडळी दुखावली जातात. तुम्ही आता मत्स्य व्यवसाय सुरू करताय त्यामुळे तुम्हाला माहीत आहे की पाण्यात राहून माशाशी वैर करता येत नाही. काय ? (लोचट हसतो) त्यामुळे आयॅम व्हेरी सॉरीटू से दॅट ५ टक्के दराने आम्ही बँकेचा विकास निधी म्हणून तुमचे २५०० रूपये कापून घेणार. अडीच नि पाच साडेसात आणि ते अडीचे असे मिळून आम्ही फक्त साडेबारा दहा हजार रूपये कापून तुम्हाला ४० हजाराचा चेक देऊ. दहा तारखेला येऊन चेक घेऊन जा...ओ.के. ? (शांतता) कसला विचार करताय सोनावणेसाहेब!

सोनावणे : पाण्यात राहून माशाशी वैर करता येत नाही हेच खरं.

बँक मॅनेजर : (हसत) दॅट्स गूड ... व्हेरी गूड ...

सोनावणे : आता एकच करतो.

बँक मॅनेजर : काय ?

सोनावणे : मुंबईला जाऊन डायरेक्टर ऑफ फिशरीज ना भेटून येतो. या प्रकल्पात त्यांनी फार सहकार्य केलंय. त्यांचा आशीर्वाद घेऊन येतो.

बँक मॅनेजर : वा-वा व्हेरी गूड. केव्हा निघताय ?

सोनावणे : दोन-चार दिवसात निघतो.

(आगगाडीच्या शिटीचा दीर्घ आवाज येतो. गाडी येऊन स्टेशनात थांबलेय. एका विशिष्ट डब्यापाशी बरेच कार्यकर्ते हारतुरे घेऊन धावतात. दुष्काळी दौरा आणि डी.पी.सी.च्या मिटींगसाठी पालमंत्र्यांचं आगमन झालंय. कार्यकर्ते त्यांना हार घालण्यासाठी झुंबड उडवतात. त्यांचे झाल्यावर आ.मोहिते गुलाबाच्या फुलांचा एक प्रशस्त हार घेऊन पुढे येतात. त्यांना हार घालतात.)

आमदार : राम राम काकासाहेब.

काकासाहेब : राम राम ! काय म्हणतोय तुमचा जिल्हा ?

आमदार : आमचा कसला आलाय जिल्हा ? तुमीच या जिल्ह्याचे पालकमंत्री!

काकासाहेब : आम्ही जरी पालक असलो तरी तुम्ही ह्या जिल्ह्याचे मालक आहात हे विसरून जमायचं नाही आम्हाला.

(त्यांच्या ह्या 'इंटेलेक्च्युअल' कोटीवर विनाकारण सर्वजण खॅ खॅ करून हसतात. इतक्यात बापटबाई पुढे होतात.)

शुभांगी : नमस्ते सर आय ॲम शुभांगी बापट ! कलेक्टर !

काकासाहेब : येस आय नो, आय नो...तुमच्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत शासनाच्या.

शुभांगी : थँक्यू सर...आय विल ऑलवेज ट्राय टू डू द बेस्ट पॉसिबल थिंग्ज्.

काकासाहेब : गूड... बोलू आपण सवडीनं....आजचा कार्यक्रम काय ?

शुभांगी : प्रथम दुष्काळी भागाला भेट, दुपारी दोन वाजता डीपीडीसीची मिटींग... रात्री आपल्याला सत्काराच्या कार्यक्रमासाठी सातारला जायचय.

काकासाहेब : ओ.के. चला निघूया. दुष्काळग्रस्त जनतेचे अश्रू पुसल्याशिवाय जीवाला चैन पडायची नाही. शुभांगी मंत्रीमहोदयांसोबत मागे बसते. आमदार ड्रायव्हरच्या बाजूला बसतात. मधे मंत्र्यांचा बॉडीगार्ड. गाड्या सुसाट वेगानं निघतात. पुढे पोलिसांची पायलट जीप. मागे मंत्र्याची पांढरीशुभ्र डी.व्ही.कार. त्यामागे कलेक्टरची लाल दिव्याची रिकामी ॲम्बॅसिडर. त्यामागे जिल्हा परिषदेच्या सी.ओं.ची गाडी. मागे कार्यकर्त्यांनी खचून भरलेल्या चार-दोन जीप्स. त्यामागे इतर अधिकाऱ्यांच्या दहाबारा गाड्या - अशी वरात निघते. कलेक्टर, मंत्री आणि आमदार गाडीत चर्चा करताहेत.

काकासाहेब : मिस बापट ह्या जिल्ह्यात काम करायचं म्हणजे एक मोठं आव्हान आहे.

शुभांगी : येस सर आय नो दॅट ॲन्ड आय ऑलवेज लाईक टू ॲक्सेप्ट चॅलेंजेस.

काकासाहेब : (स्मीत करत) नुसती आव्हानं स्वीकारून चालणार नाही. यू हॅव टू ॲक्ट ॲकॉर्डिंगली. ह्या जिल्ह्याचे दोन तालुके कामय दुष्काळी आहेत. आही गेल्या

वर्षांपासून तिथल्या दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी धडपडतोय. पण यश देणं हे परमेश्वराच्याच हाती आहे. काय हो आमदार साहेब ?

आमदार : आगदी मनातलं बोललात काकासाहेब. आता ह्या दोन तालुक्यात पाऊस पडत न्हाय त्याला आपुन काय करनार ? पाऊस पाडायची योजना आजून आपल्या सरकारनी काडलेली न्हाय ना !

(ते दोघेही मोठ्यानी हसतात.)

शुभांगी : सर मी आल्यानंतर संपूर्ण जिल्हा फिरुन पाहिला हे दोन तालुके सोडता सर्वत्र समाधानकारक स्थिती आहे. याचं कारण म्हणजे इतर तालुक्यांना मिळणारा धरणाचा ॲडव्हान्टेज वाहणारी नदी. कालव्याच्या बाजूच्या गावांनी भरपूर पाणी उचललंय. उसापासून सूर्यफुलापर्यंत अमाप पिक मिळतंय त्याना. पण आपण जर जोगाई प्रकल्पाचं काम सुरू केलं तर वरच्या बाजूला पाणी अडवून पाईप वॉटर स्कीमद्वारे ह्या दोन्ही दुष्काळी तालुक्यात भरपूर पाणी देता येईल. मग आपल्याला पाण्यासाठी परमेश्वरावर अवलंबून राहण्याची गरज नाही.

काकासाहेब : पण महाराष्ट्राची स्थापना झाल्यापासून वीस वर्षे नेवरेसाहेबानी वनमंत्री म्हणून काम केलंय इथं त्याचं का?

शुभांगी : त्यांच्या कालावधीत. जी प्रचंड जंगलतोड झाली त्यामुळे बोडका झाला हा भाग, आपल्याला कल्पना आहे...

काकासाहेब : गूड... तुम्ही चांगला अभ्यास केलेला दिसतोय.

शुभांगी : स्पष्ट बोलतेय म्हणून माफ करा पण हा प्रश्न आता स्थानिक राजकरणामुळे रखडत पडलाय...ह्या दोन्हीही तालुक्यात विरोधी पक्षांचे आमदार निवडून येतात म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणं विधायक दृष्टीकोनात बसत नाही.

(आमदार चमकून मंत्र्याकडे पहातात. ते आमदाराना गप्प बसण्याची खूण करतात.)

काकासाहेब : मिस बापट राजकारण बाजूला ठेवूनही आपणास काही उपाय योजना करता येतील असे वाटतं नाही तुम्हाला ?

शुभांगी : ऑफकोर्स सर ! बेरोजगाराना मजुरी मिळवून देणे हे मुख्य काम राहील. त्यासाठी पाझर तलावांची ग्रामीण रस्त्यांची कामं काढावी लागतील. त्या पाठोपाठ ह्या भागातील क्रॉप पॅटर्न बदलणं ही आता काळाजी गरज ठरली आहे. दुष्काळी हवामानातही भरपूर उत्पन्न देणाऱ्या बियाणांवर कृषी विद्यापीठात संशोधन चालू आहे. नवनवीन बियाणी त्यांनी शोधून काढली

आहेत. ती सी.ओ.च्या मार्फत इकडे आणून वाटावी लागतील. साधं नागलींचं उदाहरण घ्या. ते कमी पावसातही आणि दुष्काळी प्रदेशातही येणारे पिक आहे. शिवाय पोषणाच्या दृष्टीकोनातूनही ते फार महत्वाचे आहे. जे आयर्न सफरचंदामध्ये तीन टक्के असते ते नागलीत तेहतीस टक्के असते ! ह्या भागात नागलीचं पिक भरपूर येते. त्यापासून जर सुकडी बनवणारा एखादा मोठा प्रकल्प ह्या भागात उभा केला तर इथल्या शाळेतल्या मुलांना सकस आहार म्हणून सुकडी देता येईल, इतरत्रही आपण त्याला मार्केट मिळवू शकतो. शिवाय आय.आर.डी.पी., एन.आर.ई.पी., आर.एल.ई.जी.पी. इत्यादीसारख्या शासनाच्या अनेक योजना आहेत. त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर या भागातला दुष्काळ हटण्यास वेळ लागणार नाही.

(कचकन ब्रेक्स लागतात. समोर खड्डा असतो म्हणून गाड्या थांबतात. गाड्या आता दुष्काळी भागात आलेल्या आहेत. सर्वत्र उजाड, माळरान, तडकलेली, भेगाळलेली जमीन दिसते. बाजूला काही गुरं मरून पडली आहेत. कुत्री त्यांना फाडताहेत. आजुबाजूला गिधाडं. आमदार नाकाला धोतराचा सोगा लावतात. हळू हळू खड्डयातून गाड्या बाहेर पडून परत धुरळा उडवीत धाऊ लागतात. सर्वत्र विराण वातावरण पसरलेलं. झाडं तर कुठेही दिसत नाहीत)

काकासाहेब : मिस बापट तुम्ही म्हणताय ते १०० टक्के पटतंय मला पण ह्या योजना तुम्ही अधिकाऱ्यांनीच राबवायच्या आहेत.

शुभांगी : त्याची कल्पना आम्हाला आहे. आमची अपेक्षा इतकीच आहे की त्यात कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप होऊ नये.

आमदार : म्हंजे राजकारणामुळं इकासाची कामं खोळंबलीत आसं म्हना की !

शुभांगी : (निर्भिडपणे) अगदी उघड आहे ते.

काकासाहेब : मिस बापट प्लीज डोंट जंप अपॉन द कन्क्ल्यूजन. तुम्हाला अजून अभ्यास करावा लागेल. ह्या भागातील लोकांचा माईंड सेटप समजून घ्यावा लागेल. गेली वीस वर्ष ह्याचा विकास व्हावा ह्याचा ध्यास घेतलाय आम्ही.

शुभांगी : पण दुर्दैवाने अजून काहीही घडलेलं नाही. महाराष्ट्राचे भाग्यविधाते कर्मवीर नानासाहेब रोडे पाटील याच जिल्ह्यातले, यावर विश्वास बसत नाही. विशेषत: ह्या दोन तालुक्यावंर फार अन्याय झालाय तो आपण दूर केला पाहिजे एवढच मला म्हणायचंय.

काकासाहेब : (धूर्तपणे पहात) त्यासाठीच आम्ही तुम्हाला इकडे आणलंय मिस बापट.

(गाड्या एका वस्तीवर थांबतात. तिथे आधीच जाऊन थांबलेले काही कार्यकर्ते हारतुरे घेऊन धावतात. एका बाजूला आदिवासी, कष्टकरी लोकांचा एक घोळका बसलाय. सर्वांची नजर मंत्र्याकडे लागलेली. त्यांच्या अंगावर धड कपडे नाहीत की पायात चपला नाहीत. कुपोषणामुळं सारी हाडाडलेली. छातीच्या सापळयाचं दर्शन घडवणारी. त्यांच्या जवळच हडकुळी कुत्री, हाडाडलेल्या शेळया! मंत्री उतरल्यावर सर्वजण अपेक्षेने आपले डोळे त्यांच्याकडं वळवतात. नजरेला जणुकाही सुखद स्वप्नांचे एक मुलायम मोरपीस फुटते. मंत्री बोलायला सुरुवात करणार इतक्यात शेजारच्या एका झोपडीतून एक करूण हंबरडा ऐकू येतो. सर्वजण तिकडे धावतात. दोघेजण आत जाऊन सापळयासारख्या दिसणाऱ्या एका माणसाला उचलून

आणतात. तो ताठ झालाय डोळे तसेच उघडे त्याची म्हातारी आई छाती पिटत बाहेर येते. रडण्याची ताकदही तिच्यात राहिलेली नसते.)

म्हातारी : आरं माझा पोरगा मला सोडून गेला. त्याच्या पोटाला आठ दिस आन मिळालं न्हाय का तोंडात घालाया दोन थेंब पानी मिळालं न्हाय. म्या रांडेनं का म्हनू त्याला जनम दिला ? का मला असा सोडून गेलास लेकरा ?

(असे म्हणून त्याच्या शवावर ती पडते. बापटबाई पट्कन आपल्या ड्रायव्हरकडे पहातात. तो धावत जाऊन गाडीतून पाण्याचा थर्मास घेऊन येतो. बापटबाई त्या माणसाच्या तोंडात पाणी घालण्याचा प्रयत्न करतात. पण ते बाहेर येते. त्या त्याची नाडी बघतात. पण लागत नाही. तो मेलाय हे त्यांना समजते. त्या त्या म्हातारीची पाठ थोपटत ऱ्हातात, तोवर आमदार मंत्री महोदयांना एका बाजूला घेतात आणि)

आमदार : ह्या बाईपास्न जरा सांबाळून ऱ्हावा !

काकासाहेब : का ? हुषार आहे म्हणून मीच मागून घेतली तिला.

आमदार : न्हायी जरा जास्तीच हुषार दिसतंय बेनं.

काकासाहेब : (आत्मविश्वासाने हसत) हमारी बिल्ली और हमसे मॅऽऽऽ तुमचं व. दोघेही हसतात.

नानासाहेबांचे घर मँऽऽऽ व मँऽऽऽ व असा मांजरीच्या ओरडण्याचा आवाज येत आहे. नानासाहेब कोट टोपी घालत कोपऱ्यात बघतात. तिथे मांजर ओरडत बसलेय.

नानासाहेब : (आवाज वाढवत) अगं ह्या मांजरीला दूध घाल जरा...

सुभद्राबाई : (लगबगीने येत) अहो असं ओरडायला काय झालंय ?

नानासाहेब : अगं त्या मांजरीला दूध घाल जरा, मघापासून ओरडतेय ती.

सुभद्राबाई : घालते-घालते जरा धीर धरा! आणि आज सकाळंच स्वारी चालली कुठं म्हणायची ?

नानासाहेब : डी.पी.डी.सी.ची मिटींग आहे रात्री सांगीतलं होतं ना !

सुभद्राबाई : गेली चार वर्ष तुम्ही डी.पी.डी.सी.चे मेंबर आहात. पण आजंच बरं मनात आलं तुमच्या मिटींगला जाण्याचं

नानासाहेब : नवीन कलेक्टरबाई काय म्हणतात तेवढच ऐकण्यासाठी चाललोय.

(टॉप अॅन्गल वाइड शॉट. कलेक्टर कचेरीच्या आवारात महाराष्ट्र शासनाच्या गाड्यांची गर्दी. त्यात काही लाल दिव्याच्या.

तंबाखू मळत बसलेल्या वा विड्या फुंकणाऱ्या ड्रायव्हरांची आणि रिकामटेकड्या कार्यकर्त्यांची गर्दी चित्रित करत कॅमेरा मुख्य हॉलमध्ये येतो. मंत्री महोदय बसलेत. त्यांच्या बाजूला उपाध्यक्ष कमिशनरसाहेब. त्यांच्या शेजारी मेंबर सेक्रेटरी कलेक्टरमॅडम. शेजारी एक तरूण पण बावळट खासदार आकारामबापू पाटील. समोर सत्ताधारी पक्षाचे तसेच विरोधी पक्षांचे आमदार. त्यांच्यामागे सदस्य, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, सभापती आणि त्यांच्यामागे विविध खात्यांचे अधिकारी.

नानासाहेब सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या एका खुर्चीवर निवांतपणे बसून सर्व गंमत पाहताहेत. एका बाजूला प्लॅनिंग ऑफिसर आणि त्यांच्या मागे बैठकीचे इतिवृत्त घेण्यासाठी बसलेले स्टेनो. सदस्यांमध्ये काही महिलाही आहेत. कुक्कुटपालन संस्थेला डी.पी.डी.सी. फंडातून मदत देण्याच्या प्रश्नावरून वादंग माजलेले आहे.

आमदार : अध्यक्ष महोदय, डी.पी.डी.सी.च्या मागच्या मिटींगमधी आमच्या सहकारी कुक्कुटपालन संस्थेला डी.पी.डी.सी.च्या फंडातून दोन लाख रूपये अनुदान देण्याचा निर्णय झाला होता. सदरचे अनुदान अद्याप आमाला मिळालेले नाही, ह्या प्रश्नाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

(ते असे म्हणता क्षणीच विरोधी पक्षाचे दोनचार सदस्य एकदम उभे राहून कालवा करतात.)

1 : आमची सुदिक कुक्कुटपालन संस्था हाये, तिलासुदिक अनुदान मिळाया हवं.

2 : आमीपन...कुक्कुटपालन संस्था चालवतोय, तिला का नको अनुदान ?

3 : अध्यक्ष महोदय आपल्या जिल्ह्यात एकूण आठ कुक्कुटपालनसंस्था हायेती. त्या समद्याना अनुदान मिळाया हवं.

4 : आमचा ह्याला इरोद हाय, कारण व्यापक नैसर्गिक आपत्ती असेल तरच अशी मदत देता येते...

: (गोंधळ वाढत जातो. सर्वजण हमरातुमरीवर येतात.)

: तुमी खाली बसा

: मोठ्यानं बोला ऐकू येत न्हायी

: शंकरराव हाना तिच्यायला

: आरं एकावेळी एकानं बोला की

: अध्यक्ष महोदय माजं ऐकून घ्या.

अशा प्रतिक्रीया उमटवीत मोठाच गदारोळ होतो. अध्यक्ष महोदय बेल वाजवून सर्वांना शांत करतात. एवढ्यात एकजण मोठ्याने कूऽऽऽ कूच कूऽऽऽ असा आवाज काढतो. त्यावर हास्याचा एकच कल्लोळ उठतो. खा.अकाराम बापू त्यावर एक कोटी करतात. पुन्हा हास्याची एक लाट पसरते. अध्यक्ष पुन्हा पुन्हा बेल वाजवून सर्वांना शांत करतात.)

खासदार : विरोधी पक्षाचा कोंबडा दिसतोय.

मंत्री : बंधूंनो आजची ही मिटींग सहा महिन्यांच्या कालावधीनंतर होत आहे. मध्यंतरी सरकार बदललं त्यामुळे त्या मिटींगच्या वेळी जी परिस्थिती होत ती तशीच आज राहिली नाही हे उघड आहे. त्या मिटींगमध्ये आमदार मोहिते यांच्या कुक्कुटपालन संस्थेला डी.पी.डी.सी.च्या फंडातून अनुदान देण्याबद्दल काय ठराव झाला होतो ते आपण प्रथम पाहिले पाहिजे.

(मंत्री कमिशनरकडे बघतात. कमिशनर कलेक्टरकडे-कलेक्टर प्लॅनिंग ऑफिसरकडे प्लॅनिंग ऑफिसर फायलीत बघतो आणि उभा राहून ठराव वाचून दाखवतो.)

प्लॅनिंग ऑफीसर : आमदार मोहिते यांच्या सहकारी कुक्कुटपालन संस्थेस डी.पी.डी.सी.च्या फंडातून दोन लाख रूपये अनुदान देण्याचा ठराव ही सभा बहुमताने करीत आहे. मात्र सदरहू अनुदानाची शिफारस राज्य नियोजन मंडळाकडे करावी

आणि त्या मंडळाची मंजुरी असेल तरच रक्कम आदा करण्यात यावी.
(आमदार मोहिते ताड्कन उभे रहात.)

आमदार : अध्यक्ष महोदय, आमच्या संस्थेस अनुदान मिळण्यासंबंधीचा सोच्छ ठराव झालेला हाये आणि राज्य नियोजन मंडळाने पण कलेक्टरला पत्र पाटवून मंजुरी कळवलेली आहे. मी मागच्या आठवडयात पुन्यात कमिशनर सायेबाना भेटून त्यांना त्या पत्राची झेरॉक्स कॉपी देऊन आलोय.
मंत्री महोदय कमिशनर साहेबांकडे पहातात...

कमिशनर : सर वो जो लेटर है दॅट डझ नॉट अमाऊंट टू द सँक्शन लेटर बिकॉज स्टेट लेव्हल प्लॅनिंग कमिटी हॅज नो राईट टू अॅप्रूव सच टाईप ऑफ एक्सेप्शनल अमाऊंट अंटील इट सीक्स सँक्शन फ्रॉम द फायनान्स डिपार्टमेंट, दॅट हॅज बीन वोन्ली रेकमंडेशन टू द फायनान्स डिपार्टमेंट अॅन्ड वुई हॅव टू वेट फॉर देअर डिसीशन सर!

आमदार : ह्या मनन्याला काय अर्थ हाय ? मंजे स्टेट लेवल कमिटीने मंजुरी दिली तरी तुमाला आजून काय हावंय ?

शुभांगी : आमदारसाहेब तुमचा काहीतरी गैरसमज झालेला आहे. कारण अशा तऱ्हेचा अपवादात्मक निधी देण्याचा जो प्रश्न आहे त्याची वरच्या कमिटीने फायनान्स डिपार्टमेंटकडे फक्त शिफारस केलेली आहे. अशा तऱ्हेने स्वतंत्र प्रकरणाला अुनदान देता येते का याचा धोरणात्मक निर्णय एफ.डी.ला घ्यावा लागणार आहे. आज जर तुम्हाला हे अनुदान मिळाले तर उद्या महाराष्ट्रातल्या सर्व संस्था ते मागायला पुढे येतील हे लक्षात घ्या.
(काही जण हां हां बरोबर असे म्हणत माना डोलावतात.)

आमदार : मी म्हनतो का मागू नये ? त्यांचा हक्कच हाय त्यो ! त्यांना जर अनुदान मिळणार आसलं तर सरकार काय त्यांच्यावर मेहेरबानी करीत न्हाई.

शुभांगी : हा प्रश्न मेहेरबानी करण्याचा नाही आमदार साहेब, फक्त आपण मंजूर करीत असलेला पैसा योग्य कारणासाठी साठीच जातोय की नाही याची सरकारला खात्री करून घ्यायची असते.

आमदार : (संतापत) म्हंजे आमी काय चुकीच्या कारणासाठी पैसा मागतोय का काय ? आध्यक्ष महोदय, गेली पंधरा वर्षे आमही आमदार आणि डी.पी.डी.सी.चे मेंबर हाओत पन असला आरोप आमच्यावर कुनीही केला नव्हता. ह्या आरोपाची गंभीर दखल घ्यावी आशी आमी इनंती करतो. (बसतो)

मंत्री : आमदारसाहेब मला वाटतं मॅडमना तसं म्हणायचं नव्हतं पण तुम्हाला जर

तसंच वाटत असेल तर मॅडम दिलगिरी व्यक्त करतील.

शुभांगी : (बसूनच) दिलगिरी व्यक्त करण्याचा काही प्रश्न नाही अध्यक्ष महोदय, कारण कुक्कुटपालन संस्थेला अनुदान देण्याचा ह्या प्रश्नाला वेगळंच वळण लागलेलं आहे. एकदा अशा तऱ्हेनं अनुदान मिळतंय हे लक्षात आल्यावर इतर अनेकांनी गेल्या सहा महिन्यात ताबडतोब आपापल्या कुक्कुटपालन संस्थांची निर्मिती केली. ह्या आठीच्या आठी संस्था बोगस आहेत आणि त्यांना अनुदान देणं म्हणजे भ्रष्टाचाराला उत्तेजन देण्यासारखं आहे असं मला वाटंत. एकतर डी.पी.डी.सी.चा पैसा हा लोकांच्या मालकीचा पैसा आहे. त्याचा विनियोग हा लोकांच्या कल्याणासाठीच व्हायला हवा.

आज जर आमदार मोहिते यांना २ लाखांचा निधी दिला गेला तर उद्या इतर ७ संस्थांना धरून शासनाचे १६ लाख रूपये पाण्यात जातील. त्या ऐवजी जिल्हयात अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळा दुरूस्त करायच्या आहेत. ही रक्कम जर आपण त्यासाठी वापरली तर लोक आपल्याला दुवा देतील. माझ्यामते कुक्कुटपालन संस्थांसाठी नवा पैसाही मंजूर केला जाऊ नये. मग जे काय व्हायचं असेल ते होऊ दे.

(नानासाहेब, तुळपुळे आणि गोटखिंडे कलेक्टर बाईंना भेटण्यासाठी येतात.)

नानासाहेब : (हात जोडत) वही होता है जो मंजुरे खुदा होता है...

शुभांगी : या या - आपण नानासाहेब पटवर्धन ना ?

नानासाहेब : कमाल केलीत...आपणाला कसं माहीत ?

शुभांगी : कलेक्टरला सर्व गोष्टींची माहिती ठेवावी लागते. काल डी.पी.डी.सी.च्या मिटींगमध्ये माझं लक्ष होतं तुमच्याकडं बसा ना...

गोटखिंडे : (नमस्कार करत) मी बापूसाहेब गोटखिंडे दै.'सत्यप्रभा'चा संपादक.

तुळपुळे : मी दत्तात्रय तुळपुळे. (मी मोकळाच असतो.)

शुभांगी : बसा. आजचा अंक वाचला मी तुमचा. अगदी वस्तुस्थितीदर्शक बातम्या छापलेल्या आहेत. डी.पी.डी.सी.च्या मिटींगचं वृत्तसुध्दा अगदी तपशिलवार दिलंय. शिवाय आजच्या अग्रलेखात पिण्याच्या पाण्याची समस्या सुटावी म्हणून तुम्ही जी सूचना केलेली आहे तिची ही मी दखल घेतलेली आहे.

गोटखिंडे : आमच्या अपेक्षांना धक्का दिलात तुम्ही.

शुभांगी : म्हणजे काय केलं ?

गोटखिंडे : आम्हाला वाटलं होतं की इतर कलेक्टरांप्रमाणे तुम्हीही सत्तेच्या हातातलं

बाहुलं होणार...

शुभांगी : माझ्या स्वभावात ते बसत नाही. मी नेहमी सत्याच्या बाजूने उभी राहणारी अधिकारी आहे.

नानासाहेब : 'सत्यमेव जयते' असं तुमच्या त्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाटीवर तीन सिंहाच्या खाली लिहिलेले आहे. पण आज त्याला खरा अर्थ आल्यासारखं वाटलं.

शुभांगी : बरं, काय काम काढलं सांगा ?

नानासाहेब : तसं म्हटलं तर आम्ही तिघेही अगदी निरूपयोगी लोक आहोत. म्हातारपणात वेळ जात नाही म्हणून काहीतरी उचापती करायच्या एवढंच !

तुळपुळे : अहिंसात्मक मार्गाने ब्रिटीशाना हाकलवून ह्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या फंदात पडलो होतो एवढंच. (हसतात)

शुभांगी : कालच मी ती पेन्शन घेणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांची फाईल चाळली पण त्यात तुमची नावं काही कुठं दिसली नाहीत.

नानासाहेब : बाईसाहेब स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आम्ही जेव्हा तुरुंगातून बाहेर पडलो तेव्हा आमच्या गुरुने म्हणजे तात्यासाहेब बापटांनी सांगितलं होतं की आपल्या मायभूमीला स्वतंत्र केल्याची दलाली कधीही घेऊ नका.

शुभांगी : (घड्याळ पहात) छान पण आता काय काम काढलंत ?

तुळपुळे : आमच्या सौभाग्यवतींनी तुमच्यासाठी एक भेट पाठवलेय.

शुभांगी : काय ?

(तुळपुळे एक पिशवी टेबलावर उलटी करतात त्यातून काही ज्वारी खाली पडते.)

तुळपुळे : बाईसाहेब गेले कित्येक दिवस रेशनवर ही असली काळी ज्वारी मिळतेय. साखर आणि तेलाचा तर कधी पत्ताच नसतो. माझ्या पत्नीची तब्बेत ठीक नसते. तिने तुम्हाला निरोप दिलाय की एक दिवस तरी ह्या ज्वारीची भाकरी खाऊन बघा...

शुभांगी : (इंटरकॉम उचलते) डिस्ट्रीक्ट सप्लाय ऑफिसर मिष्टर पवार ? चला आपण जरा व्हिजीटला जाऊन येऊ. (तिघाना) चला तुम्हीही !

टॉप ॲन्गल वाईड शॉट. कलेक्टरची गाडी बाजारातून येत आहे. पुढे पुरवठा अधिकारी आणि तुळपुळे. मागे नानासाहेब, गोटखिंडे आणि कलेक्टर...रस्त्यावरुन एकेका ठिकाणावरून डिझॉल्व होत गाडी दुसऱ्या ठिकाणी येते. मध्येच नानांना ते खोक्यांच्या गर्दीत गुदमरलेले छोटेसे मारूतीचे देऊळ दिसते आणि ते हात जोडतात. तुळपुळे बोटाने दाखवतात त्या जागी रेशनच्या दुकानासमोर गाडी येऊन थांबते. सर्वजण खाली उतरतात. रेशन दुकानदाराची अचानक गाळण उडते. कलेक्टर त्याची सर्व कागदपत्रं हस्तगत करतात. पोत्यातील धान्य पहातात. काळी ज्वारी आणि तसलेच काहीसे भेसळयुक्त धान्य दिसते.

शुभांगी : किती युनिटसचं दुकान आहे तुमचं ?

दुकानदार : ब...बाराशे...

शुभांगी : ह्या आठवड्याची साखर आणि तेल कुठाय ?

दुकानदार : आत्ताच संपलं बाईसाहेब.

शुभांगी : साखर आणि तेलाचा पुरवठा वेळेवर होतो ?

दुकानदार : होय बाईसाहेब. गिऱ्हाइकं येऊन साखर आणि तेल लगेच घेऊन जातात.

शुभांगी : अस्सं ?

दुकानदार : होय बाईसाहेब !

शुभांगी : (मुठीत घेऊन दाखवत.) ही काळी ज्वारी कुठनं आणली ?

दुकानदार : (पवारकडे हात दाखवत) आपल्याकडनंच आलीय बाईसाहेब.

शुभांगी : मिष्टर पवार ?

पवार : येस मॅडम...यंदा उत्तर प्रदेशात लाखो टन ज्वारी पिकली. त्यातली बरीचशी सरकारनं विकत घेऊन इकडे पाठवली. इथे पोहोचेपर्यंत ती तशी थोडीशी खराब झाली आहे इतकंच.

शुभांगी : (एक मूठ ज्वारी उचलून) ही ज्वारी माणसानी खाण्याच्या लायकीची आहे असं वाटतं तुम्हाला?

पवार : तसं नाही...प...पण...एकदा शासनाचाच आदेश असल्यावर ...म...मी...तरी

शुभांगी : ओ.के.

(आतल्या एका दरवाजावर लाथ मारून तो धाडकन उघडतात. आत पाहतात. परत येतात. दुकानादाराची गचांडी धरतात आणि त्याला आतल्या खोलीत ढकलतात. तो उठून उभा राहतो तर त्याचे संपूर्ण तोंड साखरेने माखलेले असते. आतमध्ये साखरेची पोती आणि तेलाचे डबे ओळीने

ठेवलेले दिसतात. बाई पुन्हा त्याच्या गचांडीला धरून)

शुभांगी : काय...साखर आणि तेल आत्ताच संपलं ना ?

पवार : त्याला काही करू नका बाईसाहेब... आमदार मोहितेंचा पुतण्या आहे तो.

शुभांगी : मोहिते त्याचे काका असतील तर मी त्याची बाप आहे. (असं म्हणून त्याला ढकलून देतात.) आजपासून तुझं लायसन्स रद्द. माझी माणसं येऊन दुकानाला सील करतील आणि तुम्ही...मिष्टर जिल्हा पुरवठा अधिकारी

पवार : (थरथरत) येस मॅडम ?

शुभांगी : यू आर सस्पेंडेड राईट नाऊ...

(पुरवठा अधिकाऱ्याचे डोळे विस्फारलेले जातात.

ते दै.‘सत्यप्रभा’च्या पहिल्या पानावर डिझॉल्व होतात. अंकाची छपाई सुरु असल्याचे दृश्य, पेपर विकणाऱ्या पोऱ्याच्या दृश्यावर डिझॉल्व होते. पोरगा ओरडत पेपर विकतोय.)

पोरगा : जिल्हा पुरवठा अधिकारी सस्पेंड. नव्या कलेक्टर शुभांगी बापट यांच्या रेशन दुकानांवर धाडी, अनेक दुकानदारांचे परवाने जप्त... जिल्हा पुरवठा अधिकारी सस्पेंड...

कलेक्टर बंगल्याच्या आवारातील हिरवेगार लॉन. नानासाहेब, गोटखिंडे, तुळपुळे आणि कलेक्टर बाई वेताच्या खुर्च्यांवर बसून बोलताहेत. मध्ये वेताचे वर गोल काच असणारे प्रशस्त टेबल. त्यावर सरबताचे पेले.

तुळपुळे : (पेपर खाली ठेवत) बाईसाहेब या जिल्ह्यात अनेक कलेक्टर आले आणि गेले पण आम्हाला बंगल्यावर चहासाठी बोलावणाऱ्या तुम्ही पहिल्या कलेक्टर!

शुभांगी : नव्या पिढीने जुन्या पिढीच्या उपकारांचं थोडं तरी स्मरण ठेवायला हवं. तुम्ही कधीही या. काही अडचण असली तर भेटत चला. तुम्ही लोकांत वावरत असता. त्यांचे प्रश्न आणि अडचणी जास्त तीव्रपणे जाणवत असतील तुम्हाला. मला सांगत चला. सर्वसामान्य माणसाचं आणि सत्याची बाजू घेणारं काम करायला मला अगदी मनापासून आवडतं.

नानासाहेब : एकदा आमच्या त्या मारुतीला मुक्त करा म्हणजे झालं...

शुभांगी : मारूतीला ? माझ्या लक्षात नाही आलं ?

नानासाहेब : स्टेशनचौकात फार पूर्वीपासून एक मोठा मारुतीचा पार होता. ब्रिटीशांचं राज्य कसं उलथवायचं याच्या अनेक योजना आम्ही त्या पारावर बसून आखल्या. पण हळूहळू ते झाड विजेच्या तारांना अडथळा होतो म्हणून तोडलं गेलं. त्या

झाडावर बसणारी वटवाघळं कायमची गाव सोडून गेली. त्याच्या बाजूनी पान-विडी-सिगारेटचे खोके उभे राहिले.

तुळपुळे : खोक्यांची इतकी गर्दी झालीय आता की त्यात बिचारा तो मारुती अगदी अंग चोरून उभा राहिल्यासारखा दिसतो. तेवढं अतिक्रमण हटवा म्हणजे झालं...

शुभांगी : कुणाचे आहे ते खोके ?

गोटखिंडे : आमदार मोहित्यांचा पुतण्या यंदा नगराध्यक्ष झालाय. त्याने आपल्या गुंड मित्रांना तिथं आणून धंद्याला लावलंय. पण त्याना खरा आशीर्वाद आहे तो आमदार मोहित्यांचाच!

(बंगल्यातल्या छोट्याशा ऑफिसमध्ये कलेक्टरांचा पी.ए. टाईप करत बसलेला असतो. त्याला बाई फोन आणायला सांगतात. पी.ए. लाँग कॉडचा फोन घेऊन लॉनवर येतो.

शुभांगी : एसपीना लावा. ते नसतील तर डीवायएपीना लावा.
(पी.ए.एसपीला फोन लावून देतो.)

पी.ए. : कोण जाधवसाहेब का ? कलेक्टर बाईसाहेब बोलताहेत एक मिनिट...

शुभांगी : हॅलो. कलेक्टर स्पीकिंग. हे बघा आताच्या आता २०-२५ पोलीस घेऊन स्टेशन चौकात या. अगदी अर्जंट... समजलं ना... ओ.के. (पी.ए.ला) नगरपालिकेच्या चिफ ऑफिसरना लावा.
(पी.ए. फोन लावतो.)

पी.ए. : कोण दुधेसाहेब का ? एक मिनिट हं, कलेक्टर बाईसाहेब बोलताहेत. (देतो)

शुभांगी : काय दुधेसाहेब...काय चाललंय ? आराम कसला करताय ? तुमचा बुलडोझर आणि दोन जे.सी.बी. घेऊन स्टेशन चौकात या... मी तिथनंच बोलतेय. येस येस - व्हेरी अर्जंट...

स्टेशन चौक... टॉप ॲन्गलने घेतलेले दृष्य. एका बाजूने पोलीस व्हॅन सायरन वाजवत येते. दुसऱ्या बाजूने बुलडोझर येतो. तिसऱ्या बाजूने दुधेसाहेबांची गाडी आणि चवथ्या बाजूने कलेक्टरांची गाडी येते. सायरनमुळे चौकात एकाएकी लोकांची गर्दी होते. बाई खाली उतरतात. मारुतीचे देऊळ आणि त्या भोवती झालेल्या अतिक्रमाणाजवळून राऊंड घेतात. त्यानंतर त्या स्वत:

बुलडोझरवर बसतात. बुलडोझरचे राक्षसी चाक कड्कड् असा प्रचंड आवाज करत प्रत्येक खोक्यावरनं जायला लागतं. खोक्यांचे मालक भयभीत झालेले असतात. तर अतिक्रमण जाणार म्हणून अनेक लोकांना आनंदही झालेला. पोलीस लोकांची गर्दी हटवत असतात. बाईंच्या डोळ्यात अंगार. त्या सर्व खोकी भुईसपाट करतात आणि खाली उतरतात. शेजारी उभे असलेले नानासाहेब मुक्त झालेल्या मारूतीकडे पाहूहन हात जोडतात आणि

नानासाहेब : अंधार नाहीसा होऊन प्रकाश पडला रे बाबा तुझ्यावर...

माधुरीबाई आणि वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थीनी समूहगीत म्हणताहेत.

काळोखाची भीती न आम्हा आम्ही पहाटतारे
प्रकाश खेचून धरणीवरती क्षणात आणू सारे...
नव्या पिढीचे पाईक आम्ही नवीन गाणे गाऊ
नवीन क्षितीजावरती आम्ही सूर्य नवा आणू
नव्या युगातील चैतन्याचे आम्ही वादळवारे...

भांडणार ना कधीही आम्ही आकस ना धरणार
आयुष्याचे सुंदर गाणे पुन:पुन्हा गाणार
काळाच्याही पाठीवरती स्वार आम्ही होणारे...

मायभूमीच्या मातीची ही शपथ पाळण्यासाठी
माणुसकीचे सदैव गाणे राहील ओठावरती
सद्भावाचे, सहकार्याचे अमुचे नवथर नारे...

नाही भयाला, नैराश्याला मनात अमुचा थारा
उत्साहाला, पराक्रमाला मार्ग मोकळा सारा
उज्ज्वल अमुची दिशा उद्याचे मालक आम्ही सारे...
प्रकाश खेचून धरणीवरती क्षणात आणू सारे

(शाळा सुटलेली आहे. एका अरुंद बोळातून माधुरी झपाझप पावले उचलीत घरी निघाली आहे. इतक्यात दूरवरून एक मोटार सायकल भरवेगाने येते

आणि कचकन ब्रेक्स दाबून माधुरीच्या समोर आडवी उभी राहते. तिच्यावर सर्जेराव)

सर्जेराव : मला वळखलंस माधुरी ?

माधुरी : तुझं थोबाड जन्मात विसरणार नाही मी. कॉलेजात असताना माझ्या खेटरानं फोडलंय ते. आता पुन्हा हौस आलेय काय ?

सर्जेराव : तुजा हा फनकारा आपल्याला लय आवडतो बघ माधुरी. तेरा गुस्सा इतना हसीन है तो प्यार कैसा होगा ?

माधुरी : शी : शरम नाही वाटत असं घाणेरडं बोलायला ?

सर्जेराव : खरं बोलतोय ते तुला घानेरडं वाटतय मग घानेरडं बोललो तर कसं वाटलं ?

माधुरी : काय घाणेरडं बोलणार आहेस ?

सर्जेराव : (प्रयत्नपूर्वक इंग्रजी बोलत) आय वान्ट टू स्लीप वुईथ यू

माधुरी : (संतापून) नेहमी शेण खायला सवकलेल्या तुझ्या तोंडातून असलेच शब्द बाहेर पडणार. थूऽऽऽ

सर्जेराव : (गडगडाट करीत हसतो)

माधुरी : वाट सोड माझी.

सर्जेराव : नाय सोडत काय करशील ? बाबांकडं तक्रार करशील ? (पुन्हा टिंगलीने हसत) तुजा तो अहिंसात्मक बाप प्रायचित म्हणून तुला चार दिवस उपास करायला सांगल नायतर सोता आठ दिवस मीठ खायचं बंद करंल (पुन्हा हसतो)

माधुरी : नीच-हलकट ! माझ्या बाबांचं नाव घेण्याची लायकी तरी आहे काय तुझी ? तुला अखेरचं सांगते वाट सोड माझी.

सर्जेराव : कुनासाठी एवढी घाई करतीस ग मधु ? तुजा नवरा तर गेले वर्षभर बेपत्ता झालाय. आनखी किती दिवस त्याची वाट बघत बसनार ? एखादे येळेला तो मेलासुद्धा आसंल.

(माधुरी खाड्कन त्याच्या मुस्काटात मारते आणि बाजूने तरातरा चालायलया लागते. संतापाने लाल झालेला सर्जेराव क्रूरपणे मोटार सायकलला किक मारतो.)

प्रचंड वेगाने मोटार सायकल निघाली आहे. कचकन  ब्रेक्स मारून थांबते. ‘मोहिते लिकर्स’ अशी दुकानाची पाटी दिसते सर्जेराव उतरतो ताडताड आत येतो. गल्यावरचा नोकर उठून सर्जेरावला सलाम करतो. आत खूप लोक दारू पित बसलेत. सर्जेराव ताडताड जिना उतरून खाली तळघरात असलेल्या गोडाऊनमध्ये येतो. व्हिस्कीची बाटली काढतो. तशीच तोंडाला लावून ढोसतो आणि बाटली दणकन टेबलावर आपटून तिथच गाल चोळत खुर्चीत बसतो. काही क्षणात त्याचे साथीदार दार उघडून आत येतात.

1 : बॉस गूडन्यूज!

सर्जेराव : (कॉलर पकडत) कसली गूडन्यूज आनलीस रे भडव्या ?

1 : बॉस आज रात्रीच्या गाडीने सोनावणे मुंबईला जातोय. बेबी त्याला स्टेशनवर सोडण्यासाठी जाणार हाय.

सर्जेराव : खंर सांगतोयस ?

(सर्जेराव त्याला सोडून देतो.)

सर्जेराव : गाडी सुटली आणि बेबी घरी येयाला निघाली की त्या रांडेला अंधारातच उचला आणि हितं घेऊन या. काय समजलं ?

तिघेही : येस बॉस !

सर्जेराव : (दमात घेत) पन एक लक्षात ठिवा. आमदारसायेबाना ह्यातलं कायबी कळता कामा नाय.

1 : तुम उसकी फिकिर मत करो बॉस.

रेल्वे स्टेशन. गाडी सुटते. खिडकीत बसलेला सोनवणे हात हलवून बेबीला निरोप देतो. गाडी मार्गाला लागते. बेबी स्टेशनच्या बाहेर पडते आणि अंधाऱ्या रस्त्याने घरी यायला निघते.

एका वळणावर एक गाडी थांबलेली असते. तिथून जाताना अचानक बेबीच्या तोंडावर एक भक्कम हात पडतो. तिला ओरडायची अजिबात संधी मिळत नाही. दोघेजण तिला उचलतात आणि गाडीत घालतात. एकजण ड्रायव्हिंगला बसलेला असतो. क्षणार्धात गाडी स्टार्ट होते.

गोडावूनचा दरवाजा ढकलून तिघेही आत येतात. बेबीची मुटकुळी खाली टाकून दरवाजा लाऊन घेतात. सर्जेराव व्हिस्की पित बसलेला.

सर्जेराव : बहोत अच्छा किया दोस्तो... आवो आज बहोत पिएंगे.

सर्वजण ग्लास उचलतात आणि चिअर्स करतात. सर्जेराव हातात ग्लास तसाच घेऊन उठतो आणि पुढे जाऊन पायानीच ढोसलून बेबीला सुलटी करतो. तिच्या तोंडात बोळा कोंबलेला. हात मागे बांधलेले.

सर्जेराव : च च च च आरे आरे आरे...आरं ह्या हरिनीची काय दशा केलीत रं तुमी सोडा तिचे हात सोडा. तोंडातला बोळाही काडा तिच्या. इत्क्या शूर भावाच्या भनीला अशी थरथरणाऱ्या चिमणीगत बघवत नाय आमास्नी, सोडा तिला...

(एकजण तिचे हात सोडतो. एकजण तोंडातला बोळा काढतो. बेबी भेदरून पटकन एका बाजूला आधार घेऊन उभी राहते. तिच्या मागे बिअरच्या आणि व्हिस्कीच्या बाटल्यांचे खोके. सर्जेराव तिच्याकडे हिंस्त्रपणे बघतो.)

बेबी : सर्जेराव मी पाया पडते तुमच्या, भिक मागते - पन माजी आब्रू लूटू नका, मला घरी जाऊ द्या.

सर्जेराव : (छद्मीपणे) च च च च घरी जायाचं हाय रे बेबीला... घरी जायचं हाय... तिला येवस्तित घरी पोचवारे भडवीच्यानो...

बेबी : मी पदर पसरते सर्जेराव.

(त्याच्यासमोर पुन्हा तिच्या उभार वक्षस्थळांचं ते दृश्य येतं.)

सर्जेराव : (हसत) पदर पसरतीस व्हय? आरं ही पदर पसरतीय. जरा तो कॅमेरा घ्या हिंकडं.

(एकजण धावत जाऊन टेबलाच्या खणातला कॅमेरा काढून आणतो व त्याच्या बाजूला उभा राहतो.)

सर्जेराव : आता ही पदर पसरतीय. तिनी पदर पसरला की तू फोटो काडायचा बरं का? (तिला) हां पसर पदर...पसर...पसर... (हिंसकपणे) पदर पसरतीस नव्ह ?

बेबी : मला आपली बहीण माना सर्जेराव
(सर्जेराव झपाट्यानं पुढे जातो आणि तिचा पदर खेचत.)

सर्जेराव : छिनाल रांड साली. भन मानायला सांगतीस व्हय?
(झट्‌कन फ्लॅश उडतो. एक फोटो निघालेला असतो. सर्जेराव तिच्या अंगाशी झोंबतो तिचा ब्लाऊज फाडतो.)

बेबी : मला सोडा, माझी अब्रू लुटू नका... सोडा. सोडा मला...
(अशी गयावया करते पण तो तिच्या अंगाशी अधिकच झटायला लागतो. तिचा हात मजबूतपणे पकडतो. तेव्हा ती काड्‌कन त्याच्या हाताचा चावा घेते. त्यावर बोंबलत)

सर्जेराव : आरं मला चावली रांड. धरा रे धरा नागवी करा सालीला.
प्रत्येकवेळी कॅमेऱ्याचा फ्लॅश उडतच असतो. सर्जेराव तिला दारुच्या खोक्याशी आडवी घालतो. ती आता पार भेदरलेली. घामाने डबडबलेल्या तिच्या चेहेऱ्याचा क्लोजप तुकडयातुकडयानी झूम होत सर्जेरावच्या डोळ्यासमोर येतो. मधूनच तिच्या चेहेऱ्याच्या जागी त्याला माधुरीचा चेहेरा दिसतो आणि त्यामुळे त्याच्यातला सैतान आता पूर्णपणे जागा होतो आणि तो तिच्यावर झडप घालतो.

वैष्णव जण तो तेणे कहिए जो
पिड पराई जाणे रे
हे भजन मंदपणे ऐकू येते. महात्मा गांधींचा फोटो दिसतो. त्याच्याखाली नानासाहेब प्रसन्न चित्ताने चरख्यावर सूत कातत बसलेले. गोटखिंडे येतात.

गोटखिंडे : नानासाहेब एक वाईट बातमी आहे.

नानासाहेब : (वर पहात) एकच वाईट बातमी आहे ?

गोटखिंडे : नानासाहेब ही गंमत करण्याची वेळ नाही.

नानासाहेब : काय झालं ?

गोटखिंडे : काल रात्री कुणी अज्ञात गुंडांनी सोनवणेच्या बहिणीवर बलात्कार केला.

नानासाहेब : काय म्हणतोस काय ?
गोटखिंडे : हो तर!
नानासाहेब : तुला कुणी सांगितलं ?
गोटखिंडे : बातमीचं उगमस्थान कधीही सांगायचं नाही हा आमचा बातमीदरांचा धर्म.
नानासाहेब : ते ठीकय. पण या बातमीची खातरजमा करून घेतलीस का तू ?
गोटखिंडे : त्यासाठीच तर निघायचय आपल्याला चला आटपा लवकर.
नानासाहेब : तुळपुळ्याला घेऊ या?
गोरिखिंडे : त्याला बरोबर घेऊनच आलोय मी.
नानासाहेब : चला

गाडीत बसतात. गाडीचा दरवाजा लाऊन घेतात. गाडी स्टार्ट होते.

गाडीचे ब्रेक्स लागतात. दरवाजे उघडून सर्वजण खाली उतरतात.

(शहरा बाहेरील वस्ती. सार रहिवाशी बेबीच्या घरासमोर जमलेत. स्मशानशांतता. कुणीही बोलत नाही. प्रत्येकाच्या डोळ्यात दहशतीचे भाव. बेबी बाहेरच दरवाजाच्या चौकटीला मान टेकवून बसली आहे. तिच्या हातावर, तोंडावर, मानेवर ओरखडे, ओठांच्या कोपऱ्यात रक्ताची एक छोटीशी रेघ, केस कपडे अस्ताव्यस्त, डोळे सताड उघडे, नजर भकास...हरवलेली. नानासाहेब, गोटखिंडे आणि तुळपुळे येतात. लोक त्यांना वाट करून देतात. ते तिघेही बेबीजवळ बसतात. एकीकडे राजाराम तिला थोपटत आहे.

नानासाहेब : हे बघ बेबी जे काही झालं ते फार वाईट झालं पण आपण गप्प बसून चालणार नाही. आम्ही सर्वजण तुझ्याबरोबर आहोत. पण काय घडलं ते अगदी मोकळेपणानं तू आम्हाला सांगायला हवंस.

(सर्वजण अपेक्षेने तिच्याकडे बघतात. पण ती यंत्रासारखी निर्जिव, अविचल.)

गोटखिंडे : हे बघ बेबी तू आम्हाला आमच्या मुलीसारखी आहेस. आमच्यासमोर तू संकोच बाळगण्याचं कारण नाही. अपराध्यांना शासन घडवायचं तर तू बोललच पाहिजे.

(सर्वजण अपेक्षेने पहातात. पण ती तशीच अविचल.)

तुळपुळे : हे पहा अन्याय हा काही फक्त तुझ्यावरच झालाय असं समजू नको तू. जगात अशी खूप माणसं असतात. त्या सर्वांनी जर असं तुझ्यासारखं मुकं व्हायचं ठरवलं तर समाजात सर्वत्र अन्यायाचं राज्य निर्माण होईल. विचार कर आणि जे काही झालं ते स्पष्टपणे सांगून टाक.

(ती तशीच निर्जीव बाहुलीसारखी)

नानासाहेब : (राजारामला) तुझ्याजवळ तरी काही बोलली कारे ती ?

राजाराम : नाही. काल रात्री सोनवणे साहेबांना सोडायला स्टेशनवर गेली होती. त्यानंतर दिसली ती आत्ताच. विचारलं तर एक नाही दोन नाही. कुणाशीच काही बोलत नाही. मी नेमका काल फिशरीजच्या ऑफिसमध्ये पुण्याला गेलो होतो.

तुळपुळे : सोनावणेसाहेब कधी येणार ?

राजाराम : एक-दोन दिवसात येतो म्हणाले.

नानासाहेब : (बेबीला.) आमच्यावर विश्वास ठेव. काय झालं ते सांगून टाक म्हणजे आपल्याला पुढची पावलं उचलता येतील.

(बेबी तशीच अविचल)

गोटखिंडे : (नानासाहेबांच्या कानाला लागत पण बेबीला ऐकू जाईल अशा आवाजात) ह्यात त्या सर्जेरावचा तर काही हात नसेल ना ?

आता बेबीच्या गळ्यातून हुंदका बाहेर फुटतो आणि ती हंबरडा फोडते. तिचा हंबरडा आभाळ फाडीत जातो.

(ते तिघेही गाडीतून निघालेत. गाडीतच त्यांची चर्चा चालू आहे.)

तुळपुळे : आता काय करायचं ?

गोटखिंडे : मला तर असं वाटतं की असंच जाऊन त्या सर्जेरावाचं टाळकं सडकावं.

नानासाहेब : उगाच डोक्यात राख घालून घेऊन नका. त्यानंच बेबीवर बलात्कार केला असेल असा निष्कर्ष तू काढतोस कसा ?

गोटखिंडे : कसा म्हणजे काय ? सरळ आहे. त्या जमिनीवर मोहित्याचा पहिल्यापासून डोळा होता. तो राग त्याच्या पोरानं आता बेबीवर काढलाय.

नानासाहेब : पण हे सिद्ध करण्यासाठी आपल्याला कायदा हाता घेता येणार नाही. सारं काही प्रोसिजरप्रमाणे झालं पाहिजे. आपण एस.पी.साहेबांकडे जाऊ आणि कम्प्लेंट करू आधी.

गोटखिंडे : बरं बाबा तुझ्या मनासारखं होऊ दे. नाहीतर प्रथमपासून तूच आमचं नेतृत्व करतोहेस.

तुळपुळे : आधी कलेक्टर बाईंच्या कानावर घातलं तर...

नानासाहेब : त्या दोन दिवसांच्या ट्रेनिंगसाठी मसुरीला गेल्यात. उद्या संध्याकाळपर्यंत परतणार आहेत.

(पोलीस मुख्यालयाजवळ येऊन गाडी थांबते. गोटखिंडे गाडीतूनच एका हवालदाराला हाक विचारतात.)

गोटखिंडे : साहेब आहेत का ऑफिसात ?

हवालदार : बंगल्यावर गेले ते आत्ताच.

गोटखिंडे : हा एस.पी.चुकून साला कधी ऑफिसात सापडायचा नाही. चला बंगल्यावर...

गाडी स्टार्ट होते.

ब्रेकस् लागतात.

गाडी एस.पी.च्या बंगल्यासमोर थांबते. दोन भलेमोठे कुत्रे आतून भुंकायला लागतात.

बंगल्यातला हवालदार बाहेर येतो.

हवालदार : कोन पायजे ?

गोटखिंडे : एस.पी.साहेब आहेत ना ?

हवालदार : सायेब आताच हापिसात गेले.

गोटखिंडे : (आवाज चढवून) हे बघ आतमध्ये जा आणि साहेबांना म्हणावं दै.'सत्यप्रभा'चे संपादक बापूसाहेब गोटखिंडे आलेत म्हणून.

हवालदार : (सलाम करीत) हो सायेब !

(झुळझुळीत नाईट गाऊन घातलेले एस.पी.साहेब येतात. तयांच्या हातात एक कुत्र्याचा पट्टा. तो कुत्रा त्यांना बाहेर ओढत समोरच्या माणसांवर सतत भुंकतोय.)

एस.पी. : कोण आपण ?

गोटखिंडे : मी सत्यप्रभाचा संपादक गोटखिंडे, हे नानासाहेब पटवर्धन आणि हे दत्तात्रय तुळपुळे

ते दोघेही : नमस्कार साहेब.

एस.पी. : काय काम होतं ?

नानासाहेब : काल रात्री बेबी सोनवणे नावाच्या एका तरुणीवर बलात्कार झालाय.

एस.पी. : मग ?

नानासाहेब : एका गरीब घरातली सज्जन मुलगी आहे ती. तिचा भाऊ रिटायर्ड मिलिटरीमन आहे.

एस.पी. : मग ?

नानासाहेब : आपल्याच शहरातील काही बदमाशांचं हे काम आहे असं आम्हाला वाटतं. त्यांनी त्या परिसरात इतकी दहशत बसवलेय की कुणीच काही बोलायला तयार नाही. म्हणून आम्ही तक्रार करायला आलोय.

एस.पी. : मग मी काय करु? तुमची तक्रार लिहून घेऊ ? कारकून वाटलो का मी तुम्हाला?

नानासाहेब : आम्ही फक्त तुमच्या कानावर घालण्यासाठी आलो.

एस.पी. : त्याची काय गरज होती ? तिकडं पोलीस चौकीवर जाऊन तक्रार करा.

गोटखिंडे : (संतापत) तुमच्या ज्युरिडिक्शनमध्ये एका गरीब मुलीवर बलात्कार होतो याचं काहीच गांभीर्य वाटत नाही तुम्हाला ?

एस.पी. : तुम्ही मला अक्कल शिकवू नका. कदाचित तुम्हीच त्या मुलीवर बलात्कार करुन खोटी तक्रार द्यायला आलेले असाल. जास्त शहाणपणा केलात तर आत टाकीन समजलं? (शांतता) कमॉन टॉमी...
(कुत्र्याला घेऊन आत जातो. गोटखिंडे आवाज चढवून काहीतरी बोलणार असतात पण नानासाहेब हातानीच त्यांना शांत करतात.)

तिघेही पोलिसचौकीत एका बाकड्यावर बसलेत. समोर ठाणेअंमलदार. त्याने तक्रार लिहून घेतली आहे. त्याखाली तो तीन रेषा मारतो आणि त्यांना सांगतो.)

ठाणे अंमलदार : ह्यावर सह्या करा. (नानासाहेब आणि तुळपुळे सह्या करतात. गोटखिंडे सहीसाठी पेन टेकवतो डिझॉल्व)

आता गोटखिंडे आपल्या प्रेसमध्ये बसलेले. त्यांनी बातमी लिहिलेली आहे. तिला ते हेडिंग देतात. हेडिंग लिहिताना एकेक अक्षर स्क्रीनवर दिसते.

*माजी सैनिकाच्या बहिणीवर अज्ञात गुंडांचा बलात्कार. पोलीस चौकशीत दिरंगाई.*

हेडिंग लिहून गोटखिंडे कॉप्या फोरमनच्या हातात देतात. धडाधड मशीन फिरते. बेबीच्या फोटोसह पहिल्या पानावर मोठी बातमी प्रसिद्ध झालेली. छपाई सुरु असतानाच आमदार बातमी वाचत असल्याचा आवाज  येतो. नंतर ते दिसतात.)

आमदार : या बलात्कारामागे शहरातील काही लोकप्रतिनिधींच्या मुलांचा हात असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. त्यांच्या नावासंबंधीचे प्राथमिक धागेदोरे हाती आले असून लवकरच त्यांची नावेही प्रसिद्ध केली जातील.

(आमदार संतापने थरथरत पेपर खाली ठेवतात. चष्मा काढून हातात घेतात आणि वाघासारखी डरकाळी फोडत. सर्जेरावाला बोलावलतात.

सर्जेराव येतो. एक्सरे मशीनने जशी माणसाची तपासणी करतात तसे लक्षपूर्वक सर्जेरावला न्याहाळीत ते)

आमदार : सर्जेराऽऽव परवा रात्री कुठं शेन खायला गेला व्हतात ?

सर्जेराव : परवा रातच्याला तर आमी सर्व मित्रमंडळी आपल्या पोल्ट्रीफार्मवर पार्टीसाठी गेलो व्हतो.

आमदार : (त्याच्या कॉलरला पकडून संतापाने) भडव्या सोताच्या बापाशी खोटे बोलतोस ? परवा मी सोता फार्मवर वस्तीला व्हतो.

सर्जेराव : प...प...प...पन म्या त...त...

आमदार : काय त...त...प...प... करतोस ? खरं सांग परवा रातच्याला कुठं व्हतास ?

(आमदार आपल्या  भेदक नजरेने सर्जेरावकडे रोखून पाहतात. तो भयभीत झालेला. काय ओळखायचे ते ओळखतात आणि)

आमदार : भायेर श्यान खान्याची आवदसा सुचू नये म्हणून तुमचं लगीन करून दिलं. पन इरडीला चटाकलेल्या ढोरात आजून तुमी उकीरडे फुकीत फिरताय. वाटोळ कराल एकदिस आपल्या बापाचं.

आमदार : रामराम एस.पी.सायेब. आमदार मोहिते बोलतोय.

एस.पी. : रामराम साहेब बऱ्याच दिवसानी गरीबाची आठवण काढलीत! बोला काय हुकूम?

आमदार : आमी तुमाला कसला हुकूम करनार सायेब ? उलट आमी तुमच्या हुकूमाचे ताबेदार.

एस.पी. : (हसत) काय विशेष ?

आमदार : तसं काय इशेष न्हाय पण एक इनंती करायची व्हती.

एस.पी. : काय ते सांगा की.

आमदार : म्हजे त्याचं आस हाय की कदीकदी सुक्याबरोबर वलंबी जळतं तशातली भानगड हाय.

एस.पी. : काय ते स्पष्ट बोला आमदार साहेब मी असताना तुम्हाला काळजी करण्याचं काहीच कारण नाही.

आमदार : आजचा 'सत्यप्रभा' वाचलात का तुमी

एस.पी. : हा...हा... वाचला की.

आमदार : त्यातलं ते बलात्कार प्रकरण

एस.पी. : हा...हा....आलं लक्षात. काल ते तिघेही स्वातंत्र्यसैनिक आले होते माझ्याकडे तक्रार द्यायला.

आमदार : (डोळे चमकतात) आसं ? काय झालं मग?

एस.पी. : मग काय होणार ? दिलं हाकलून. अहो रोज असे कितीतरी बलात्कार होतात तिथं एस.पी.काय बोंबलणार ?

आमदार : ते तुमचं बरोबर हाय म्हना सायेब पन ह्या प्रकरनात जरा... म्हंजे माजी खात्री न्हाय पन आमच्या चिरंजीवानी जरा कायतरी पराक्रम केलेला दिसतोय...

एस.पी. : आणखी कोण कोण होतं त्याच्या बरोबर?

आमदार : त्याची ती नेहेमीची गँग!

एस.पी. : हा प्रकार डोळ्यानी बघितलाय का कुणी?

आमदार : ते कळायला काय मार्ग न्हाय

एस.पी. : बघू, होईल काहीतरी, मी स्वत:च जाऊन माहिती घेतो.

आमदार : त्या पोरीचा भाव हाय रिटायर्ड मिलिट्रीमन आणि परत ह्या तीन रिकामटेकड्या सोतंत्रसैनिकानी त्यात इंट्रेस घेतलाय. गोरखिंड्या तर आता रोज पेप्रात काय तरी उलटसुलट छापत ऱ्हानार...

एस.पी. : अहो पण त्याना काही ठोस पुरावा मिळायला हवा ना ?

आमदार : त्येबी खरंच हाय म्हना पन तुमची काही मदत मिळाली आसती तर बरं झालं असतं.

एस.पी. : तुम्ही काही काळजी करु नका साहेब फक्त एकच करा-

आमदार : हुकूम करा फक्त!

एस.पी. : आताच त्या पोरीला मेडिकल एक्झामिनेशनसाठी सिव्हील हॉस्पिटलला आणलीय. तुम्ही जरा त्या सिव्हिल सर्जनला मॅनेज करा मंजे झालं.

आमदार : त्ये काम करतो मी सायेब.

एस.पी. : मग झालं तर.

आमदार : वेळ मिळाला की येतो लगेच तुमची सेवा करायला.

एस.पी. : सेवा!

आमदार : सेवा म्हंजे आपलं ते... (दोघंही खळखळून हसतात.)

(नोटांनी भरलेली बॅग घेऊन आमदार आपल्या अँबॅसिडरमधून एका बंगल्याच्या आवारात उतरतात. फाटकावरच 'धन्वंतरी' अशी पाटी दिसते. बॅग घेऊन आमदार आत येतात. आत सिव्हिल सर्जन त्यांच्या चेंबरमध्ये बसलेत.)

आमदार : येऊ का डॉक्टरसायेब?

सर्जन : कोण आमदारसाहेब का? वा. वा. या. आज बरी वाट चुकलात इकडं

आमदार : वाट मुद्दाम वाकडी करावी लागली.

सर्जन : बोला...

आमदार : तसं काही इशेष नाई पन. . .

सर्जन : स्पष्टपणे बोला आमदारसाहेब

आमदार : परवाचं ते बलात्कार प्रकरन...

सर्जन : बरं मग?

आमदार : त्या पोरीला तपासणीसाठी आता सिव्हील हॉस्पिटलला आणलीय

सर्जन : बरं मग?

आमदार : (बॅग उघडत) तसं काही इशेष न्हाई पन म्हनलं तुमची जरा सेवा करावी. .

(नोटांची बंडलं पाहून सिव्हिल सर्जनचे डोळे विस्फारतात व बॅग आपल्याकडे ओढत)

सर्जन : ठीक. . . ठीक. . . आलं लक्षात. तुम्ही अगदी निर्धास्त रहा.

(हसत हसत आमदार बाहेर येतात. गाडीत बसतात.गाडी फाटकाबाहेर पडते. आणि सुसाट वेगानं आमदार निवासाच्या रस्त्याला लागते. पण गेटच्या समोर आणखी एक गाडी असते. त्या गाडीत बसलेले असतात गोटखिंडे! हा सर्व प्रकार ते पहात असता. आणि मग त्यांचीही गाडी उलट्या दिशेने सुसाट निघते.

(स्टेशनचौकात लोकांचा एक मोठा घोळका चर्चा करीत उभा आहे. त्यातील एक दोघांच्या हातात दै. 'सत्यप्रभा'चे अंक.)

6 : बलात्कारात सर्जेराव अडकणार

1 : बेबी सोनवणे बलात्कार प्रकरणात आमदार मोहित्यांचा हात आहे म्हणे.

2 : तो माणूस असं काही करील असं वाटत न्हाय पन.

3 : पेपरमध्ये तर स्पष्टपणे लिवलंय की जिमीन देत न्हाय म्हणून बापलेकांनी संगनमत करून बलात्कार केला.

4 : आसं लिवलंय ? वाचून दावा बरं जरा कुनीतरी.

5 : (वाचतो) कॅप्टन चंद्रा सोनावणे यांना शासनाने इनाम दिलेली दहा एकर जमीन आपल्या कागद फॅक्टरीसाठी मिळत नाही म्हणून चिडून जाऊन सोनवणेच्या बहिणीवर बलात्कार करण्यचा घाट घालण्यात आला. हे प्रकरण उघडकीस आलयावर आमदार मोहिते यांनी पोलीस आणि सिव्हील सर्जनना लाच देऊन सर्व पुरावा नष्ट केला. याप्रकरणी शासनाने लक्ष घालावे म्हणून नागरिक मागणी करीत आहेत.

घामाने डबडबलेला आमदार मोहितेंचा अस्वस्थ चेहेरा. क्लोज्अप. समोरचा व्हिस्कीचा ग्लास ते एका दमात रिकामा करतात.

प्रेस : गोटखिंडे, नानासाहेब आणि तुळपुळे चर्चा करीत बसले आहेत.

नानासाहेब : जरा सांभाळून लिही रे बाबा. तो मोहिते किती उलट्या काळजाचा माणूस आहे ते माहिताय ना तुला ?

गोटखिंडे : पण आता आपल्याला काळजी करण्याचं काही कारण नाही. कारण लोकांनीच हा इश्यू आता उचलून धरला आहे. वेळ मिळेल तिथे लोक ह्याच विषयावर चर्चा करीत आहेत.

(ह्यांचे बोलणे सुरू असताना प्रेससमोर सर्जेरावाचा एक साथीदार टेहाळणी करीत असतो. या तिघांचं काहीतरी गुप्त खलबत चाललंय असं त्याला वाटतं आणि सुसाट वेगानं तो सर्जेरावला खबर देण्यासाठी जातो.)

तुळपुळे : पण उद्या प्रत्यक्ष लढायची वेळ येईल तेव्हा आपल्या बाजूनं किती लोक उभे राहितील ?

नानासाहेब : त्यात आपण अहिंसावादी! आपल्याकडं शस्त्र काहीच नाहीत.

गुप्तीचे एक लखलखीत पाते स्क्रिनवर येते. त्याच्या मागोमाग एक तलवार आणि एक चाकू तळपताना दिसतो. गोडावूनमध्ये सर्जेराव आणि त्याचे साथीदार सुडाच्या भावनेनं पेटून उठलेत. आपल्या हिंस्त्र नजरेनं गुप्तीचे पाते न्यहाळतो.

(अंधारातून चार मोटारसायकली सुसाट वेगानं येतात. तुळपुळेच्या घराच्या फाटकापाशी थांबतात. चौघानीही तोंडावर काळी कापडं बांधलेली फक्त त्याचे डोळे दिसतात. सर्जेराव दारावरची कडी खड्खड् वाजवतो.

शांताबाई : (आतून) आले आले. किती उशीर करायचा... आले आले...

(दरवाजा उघडतात आणि दारात उभे राहिलेल्या ह्या चौधांना बघून भयभीत होतात.)

शांताबाई : क...कोण तुम्ही ? काय हवंय तुम्हाला ?

सर्जेराव : तुझा तो थेरडा क्रांतीकारक नवरा कुठाय ते दाखव आमाला.

शांताबाई : ते अजून घरी आलेलेय नाहीत. प...पण का ?

(सर्जेराव नजरेनेच एकाला खूणवून आत बघायला सांगतो तो आतून फिरून येत मान हलवून नाही म्हणतो.)

सर्जेराव : कुंकु बळकट म्हणून तुझा नवरा वाचला आज.

(असं म्हणून शांताबाईंच्या दंडाला खूचन त्याना तो खाली ढकलून देतो. त्या तशाच मुटकुळ्यासारख्या पडून राहतात. अंधरातच गाड्या स्टार्ट झाल्याचे आवाज.)

(चौकाजवळ त्या चार भरधाव जाणाऱ्या गाड्यांना क्रॉस करून गोटखिंडेंची गाडी तुळपुळेंच्या घराच्या फाटकापाशी येऊन थांबते. तुळपुळे उतरतात.)

तुळपुळे : येताय काय सरबत घ्यायला?

नानासाहेब : आता रात्रीचे दोन वाजलेत. ही काय सरबत घेण्याची वेळ आहे.

गोटखिंडे : उगाच बिचाऱ्या शांताबाईना त्रास...

नानासाहेब : निवेदिता आजोबा कधी येणार असं म्हणत म्हणत झोपी गेली असेल. मंडळी वाट पहात असतील. निघतो आम्ही. (गाडी सुरू होणार तेवढ्यात) अरे हां, परवा माझा तो चष्मा इथे राहिला तेवढा आणून दे बरं.

तुळपुळे : हां, आलोच लगेच.

(तुळपुळे शांता, ए शांता अशा हाका मारत पायऱ्या चढून वर येतात. पाहतात तर दरवाजा उघडा. आत अंधार. पुन्हा हाका मारतात. शांता, ए शांताऽऽ कुठं गेली ही रात्रीची असं म्हणून लाईट लावतात. पहातात तर शांताबाई मघाशी जिथं पडलेल्या असतात तिथंच मुटकुळ्यासारख्या पडलेल्या. त्यांच्या जवळ जात.

तुळपुळे : शांता, ए शांता (असं म्हणून ते शांताबाईना हलवतात पण तोवर त्यांच्या कुडीतून प्राण उडून गेलेला.)

सर्वस्व संपल्याप्रमाणे ते शांताऽऽ असा हंबरडा फोडतात. त्यांचा तो करुण गंभीर हंबरडा घशातून चिरकत चिरकत बाहेर येतो आणि गलितगात्र झालयासारखे ते तिथेच अश्रू ढाळत खाली बसतात. त्यांचा आवाज ऐकून नानासाहेब आणि गोटखिंडे आत येतात. झालेला प्रकार पाहून थिजून जातात. गोटखिंडे पुढे जाऊन शांताबाईंच्या देहाची नीट पहाणी करतात. त्यांच्या मनात चार मोटार सायकली सुसाट वगाने गेल्याची आठवण जागी

होते. डोळ्यात आग फुलते. नानासाहेबांच्या ते लक्षात येत आणि ते त्याना थोपटून धीर देत.

नानासाहेब : वासांसीजिर्णानी यथा विहाय
नवानी गृण्हाति नरोपराणी
तथा शरीराणी विहाय जिर्णान्
अन्यानी संयाती नवानी देही.

शांताबाईंची तिरडी फाटकाच्या बाहेर पडते तेव्हा बाहेर सर्वत्र शुकशुकाट असतो. शेजारपाजारची पाच पंचवीस माणसं अंत्ययात्रेत सामील झालेली. टॉप ॲन्गल वाइड शॉट. अंत्ययात्रा पुढे सरकताना काळीज फाटल्यासारखा सूर्य उगवतो. पार्श्वभूमीवर गाणे..

पायतळी ही पडली येथे सुंदर शाश्वत मूल्ये
जळणाऱ्याही सरणाधूनी भाग्य कुणाचे उजळे
माणूस ठेवून आज पटावर काळ खेळतो खेळी
काळ बदलला नव्या दिसाची जळे अंतरी होळी

नदीकाठचे स्मशान. शांताबाईंची चिता रचून तयार आह. शेजारी तुळपुले विमनस्कपणे बसलेत. वरती छोट्याशा कचेरीत नानासाहेब आणि गोटखिंडे चौकीदाराशी बोलत आहेत. चौकीदार दारु प्यायलेला.

चौकीदार : हे बगा मयताचा दाखला दिल्याबिगर म्या तुमाला मयत पेटवून देणार न्हाय.

गोटखिंडे : पण आता इतकं सकाळच्या वेळी तुम्हाला मृत्यूचा दाखला कुठनं आणून द्यायचा!

चौकीदार : ते तुमचं तुमी बगा. हितं नियम म्हंजी नियम. म्या मयताचा दाखला घेतल्याबिगर मयत पेटवून देणार न्हाय.

नानासाहेब : अहो पण आता थोड्या वेळानं ऑफिस सुरू झालं की दाखला आणून देऊ.

चौकीदार : त्ये मस्नी काय ठांव नाय इथला नियम हाय. दाखला आनल्यावर मयत जाळा. साहेब माझ्यावर ॲक्शन घेत्याल. काय भानगड-बिनगड आसली मं?

नानासाहेब : अहो त्यात कसली आलेय भानगड? शांताबाई म्हणजे सुप्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय तुळपुळे यांच्या पत्नी. त्यानी ब्रिटीशांच्या काठ्या अंगावर झेलल्या म्हणून आज स्वतंत्र देशात वावरतोय आपण.

चौकीदार : त्ये मस्नी काय ठावं न्हाय. कुनी झक माराय सांगिटली व्हती?

(गोरखिंडे क्रोधायमान होऊन वरती उठतात. तेव्हा नानासाहेब त्यांना थोपवतात. त्यांचा रुद्रावतार बघून चौकीदार घाबरतो पण तो पुन्हा पुटपुटतोच.)

चौकीदार : नियम म्हंजी नियम.

(नानासाहेब क्षणभर विचार करतात आपल्या कोपरीत हात घालतात आणि दहा रुपयांची एक नोट काढून चौकीदाराच्या हातात ठेवतात. चौकीदाराच्या चेहेरा उजळतो आणि धडाधड पेटेलेल्या चितेत डिझॉल्व होतो. तेव्हा थीम साँगमधली पुढील ओळ करुणपणे ऐकू येते.)

जळणाऱ्याही सरणामधूनी भाग्य कुणाचे उजळे.

(चिता धडाडून पेटली आहे. तिघेही निश्चलपणे बसलेले आहेत. इतक्यात वरुन 'बापूसाहेब बापूसाहेब' अशा हाका मारत त्यांचा फोरमन धावत येतो.)

फोरमन : बापूसाहेब, बापूसाहेब.

गोटखिंडे : अरे काय झालं ते तरी बोल?

फोरमन : आपल्या प्रेसला आग लागली बापूसाहेब.

(स्मशान गोटखिंडेच्या डोळ्याभवती गरगरा फिरायला लागत. त्यातच आमदार मोहितेंचा हझीपणे हसणारा चेहरा त्यांच्यासमोर येतो. त्यांचे डोळे आग ओकू लागतात.)

गोटखिंडे : आता त्या आमदार मोहित्याला जिवंत जाळल्याशिवाय स्वस्त्य बसणार नाही मी.

(नानासाहेब त्याना अडवतात.)

नानासाहेब : डोक्यात राख घालून घेऊ नको.

गोटखिंडे : राख घालू नाहीतर काय करु? माझ्या सर्वस्वाची होळी झाली आज. मी पै-पै जमा करुन कुणाचीही लाचारी न पत्करता उभ्या केलेल्या माझ्या छापखान्याची माझ्यासमोर राख-रांगोळी होत असताना मी डोक्यात राख घालू नको तर काय करु? सोडा मला.

नानासाहेब : माझे दोन शब्द ऐक बापू.

गोटखिंडे : मला कुणाचंही काहीही ऐकायचं नाही तुमचं अहिंसेचं तत्वज्ञान तर मला मुळीच ऐकायचं नाही. ठोशाला ठोसा दिल्याशिवाय या जगात आपला निभाव लागणार नाही हे कळून चुकलंय मला. मी असाच्या असा जाऊन आता त्या मोहित्याच्या नरडीचा घोट घेतो.

नानासाहेब : मोहित्याच्या नरडीचा घोट घेण्यापेक्षा पुन्हा नवा प्रेस उभा करण्याचं आव्हान मोठं आहे बापू. तेवढी शक्ती आहे तुझ्यात. तुझ्यातील शक्तीचा वापर तू रक्तपात घडवून आणण्याऐवजी नवीन जीवनाच्या उभारणीसाठी कर. अहिंसा हेच सांगते.

गोटखिंडे : (हिसडा देऊन स्वत:ला सोडवून घेत पळत)
तुमचं अहिंसेचं तत्वज्ञान गांडूगिरीचं तत्वज्ञान आहे. माणसाला षंढ बनवणारं तत्वज्ञान आहे ते! आजच्या युगात त्याला दमडीचीही किंमत राहिलेली नाही. मी चाललो... त्या मोहितेचा सूड घेतल्याशिवाय गप्प राहणार नाही मी...

नानासाहेब : आवाज वाढवतो बापू मागं फिर तुला ह्या मायभूमीची शपथ!
(गोटखिंडेंचे पाय अडखळतात. शक्तिपात झाल्यासारखे जागीच थांबतात खुरडत खुरडत ते नानाजवळ येऊन त्याना गदागदा हलवत.)

गोटखिंडे : का तुम्ही मला ह्या मायभूमीची शपथ घालून माझा अवसानघात केलात नानासाहेब? का? (ढसाढसा रडतो)

नानासाहेब : अशा परीक्षेच्या क्षणीच माणसानं सावरायचं असतं. ह्या क्षणाच्या कड्यावरनं कोसळला असतास तर विनाशाच्या खाईत पडला असतास. म्हणून मी तुला शपथ घातली. माझा मार्ग लांबपल्याचा आहे पण तोच सत्याकडं जाणारा आहे बापू. एक लक्षात ठेव, सत्याला नेहमी बाहेर पडण्याची खोड असते ते कधीच कायम स्वरुपी लपून बसत नाही.

गोटखिंडे : मग ह्या सत्याचं दर्शन आपल्याला होणार तरी कधी?

नानासाहेब : तो दिवस आता फारसा लांब नाही.
प्रेस धडाधडा जळतेय. गोटखिंडे नानासाहेब व तुळपुळे अस्वस्थ. नानासाहेब गोरखिंड्याच्या पाठवर थोपटत त्याना धीर देतो.

नानासाहेब : बापू तू असाच घरी जा आणि नवा प्रेस उभारण्याच्या मागे लाग. मी आणि तुळपुळे आमच्या कामाला लागतो.
(ते तिघेही कृतनिश्चयाने प्रेसच्या त्या आगीतून चालत जाताना दिसतात. नानासाहेबांच्या चालण्यातून दांडीयात्रेत गांधीजी जसे चालत गेले त्याची आठवण यावी.)

'प्राणांतिक उपोषणाचा' फलक दिसतो. 'रघुपती राघव राजाराम' ह्या भजनाचे मंद सूर ऐकू येत आहेत. स्टेशनचौकात गांधीजींच्या पुतळ्याखाली नानासाहेब चरख्यावर सूत कातीत बसले आहेत. त्यांच्या एका बाजूला तुळपुळे तर दुसऱ्या बाजूला बेबी. समोर वस्तीवरचे सर्व लोक. शेजारी 'आ.मोहिते याच्या कारस्थानाची चौकशी झालीच पाहिजे'. 'बलात्कारी सर्जेराव मोहीतेला अटक करा' असे बोर्ड लागलेले असतात. समोरच्या रस्त्याने बापटबाईंची लालदिव्याची गाडी येते. त्या उतरतात व लगबगीने नानासाहेबांच्या जवळ येऊन बसत.

शुभांगी : काय पाहतेय मी हे नानासाहेब?

नानासाहेब : (सूत कातत) तुम्ही प्रशिक्षणाला गेलात आणि दोन दिवसातच सगळं रामायण झालं. सर्जेरावानं ह्या पोरीवर बलात्कार केला. त्याच्या गुंडांच्या दहशतीमुळं तुळपुळेंची पत्नी शांताबाई हे जग सोडून गेल्या. गोटखिंडेच्या प्रेसला आग लावण्यात आली.

शुभांगी : ओ गॉड! काय ऐकतेय मी हे?

तुळपुळे : शब्दन् शब्द खरा आहे. गुन्हेगार ताठ मानेनं फिरताहेत गावातून.

शुभांगी : (उठत) आय विल पूट देम बिहाइंड द बार्स विदीन नो टाईम. सगळ्यांना हातकड्या घालून आत टाकते, फक्त काय झालं ते मला नीट समजावून सांगा आणि थोडा वेळ द्या...

नानासाहेब : तुम्हाला जो पुरावा हवाय तो आमच्याजवळ नाही आणि पुराव्याशिवाय तुमचा एक कागदही हलू शकत नाही.

शुभांगी : फरगेट अबाऊट एव्हीडन्स!

शुभांगी गाडीत बसते.

गाडी कलेक्टर ऑफिसच्या दारात थांबते. शुभांगी उतरते आणि झपाझप आपल्या चेंबरमध्ये येते. फोन उचलूला स्टेनोला. एस.पी. ना लावा. ठेवते. रिंग वाजते उचलते.)

शुभांगी : कलेक्टर स्पीकिंग.

एसपी : नमस्ते मॅडम मी एस.पी.बोलतोय.

शुभांगी : त्या बेबी सोनवणेवर बलात्कार झाला...

एस.पी. : असं काहीतरी पेपरमध्ये वाचलं होतं.

शुभांगी : नुसतं वाचून गप्प बसलात ?

एस.पी. : सवय झालेय मॅडम आता. हे पेपरवाले काय वाट्टेल ते छापतात. तुम्हाला ह्या जिल्ह्याची माहिती नाही अजून.

शुभांगी : त्या बेबी सोनवणेला भेटलात तुम्ही ?

एस.पी : तिला काय भेटायचं ? ह्या हल्लीच्या पोरी फार बदमाश असतात मॅडम. एखाद्याला बदनाम करण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची तयारी असते त्यांची. बेबीनं आणि तिच्या भावानं आमदार मोहितेंना बदनाम करण्याचा कट रचलाय.

शुभांगी : आमदार मोहितेंची वकिली करताय तुम्ही.

एस.पी. : पुरावा त्यांच्या बाजूनं आहे मॅडम.

शुभांगी : तुम्ही आत्ताच्या आत्ता मोहितेला आणि त्याच्या त्या गुंड पोराला अटक करा.

एस.पी. : पुरावा असल्याशिवाय काहीही करू शकत नाही मी.

शुभांगी : धीसीज् माय ऑर्डर.

एस.पी. : आय ॲम सॉरी मॅडम... आय कॅनॉट ओबे धीस ऑर्डर.

शुभांगी : (संतापाने थरथरत) सी आय विल टॉक टू द डी.जी.

एस.पी : आय हॅव ऑलरेडी स्पोक टू हिम ॲन्ड रिपोर्टेड द फॅक्टस्...

शुभांगी : देन आय विल टॉक टू द सेक्रेटरी होम.

एस.पी. : यू आर वेलकम मॅडम बट सेक्रेटरी होम कम्स फ्रॉम रेव्ह्यून्य मशीनरी. ही इज नॉट नेसीसरीली ॲक्वेंटेड विथ हाऊ पोलीस डिपार्टमेंट फंक्शन्स.

शुभांगी : दॅट आय विल सी.

एस.पी. : बेस्ट लक् मॅडम.

(शुभांगी संतापाने थरथरत आहे. फोन उचलून स्टेनोला)

शुभांगी : गेट मी सेक्रेटरी होम. मेक इट् अ लायटनिंग कॉल... (फोन ठेवते)

(फोन वाजतो)

शुभांगी : सर कलेक्टर शुभांगी बापट स्पिकिंग.

आवाज : (त्याचा फक्त आवाज येतो. चेहरा दिसत नाही.) येस ?

शुभांगी : सर इथे बेबी सोनवणे नावाच्या मुलीवर बलात्कार झालाय. सर्जेराव नावाच्या आमदार मोहितेंच्या मुलाने तो केलाय अशी खात्री आहे लोकांची आमदार मोहितेही त्यात इन्वॉल्व आहेत. त्यांच्या गुंडांनी इथल्या एका स्वातंत्र्य सैनिकाच्या पत्नीचा  बळी घेतलाय. एका वृत्तपत्राच्या कार्यालयास आग लावलीय.

आवाज : आय नो ऑल धीस. आत्ताच होम मिनिस्टरकडे आमची मिटींग झाली.

शुभांगी : पण सर गुन्हेगारांना अद्याप अटक झालेली नाही. ते उजळ माथ्याने फिरताहेत.

आवाज : त्यांच्या विरुद्ध काही पुरावा आहे का तुमच्याकडं?

शुभांगी : (गप्प्)

आवाज : नाही ना? मग त्यांना आपण गुन्हेगार कसं म्हणणार? सी मिस बापट यू आर व्हेरी यंग इन धिस सर्व्हीस. आय वूड लाईक यू टू ॲडव्हाईज यू दॅट प्लीज डोन्ट, आय मीन पोलिसांच्या कामात हस्तक्षेप करु नका...

बापट बाई आपल्या बंगल्यात अस्वस्थपणे येरझारा घलताहेत. वेळ रात्रीची. अचानक टेलिफोनची बेल हिंस्त्रपणे वाजायला सुरूवात होते.

शुभांगी : हॅलोऽऽऽ

आमदार : नमस्कार बाई. काय वळखलं का?

शुभांगी : मी एकदा ऐकलेला आवाज कधी विसरत नाही आमदार मोहिते.

आमदार : एक इनंती करायची व्हती.

शुभांगी : काय?

आमदार : तुमी ह्या बलात्कार प्रकरनात पडू नका.

शुभांगी : म्हणजे त्यात तुमचा हात आहे हे मान्य करताय तुम्ही!

आमदार : (हसत) बोलण्यात फार चतुर हात बाई तुमी, पन आमीही काय कच्च्या गुरुचे चेले नाही.

शुभांगी : काय ते स्पष्टपणे बोला.

आमदार : दुसरं काय बोलायचं? जिल्याच्या इकासाचे इतर अनेक प्रश्न धूळ खात पडलेत... दुष्काळाचा प्रश्न वाढत चाललाय.

शुभांगी : पण हा प्रश्न एका मुलीच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे आणि तो मला सर्वात महत्त्वाचा वाटतो.

आमदार : बाई बोलन्यात तुमी फार चतुर हात पन हे प्रकरन तुमाला जड जाईल.

शुभांगी : मिष्टर मोहीते हे प्रकरण आपल्यालाच जड जाणार आहे हे समजलय तुम्हाला आणि त्यामुळंच घाबरुन तुम्ही मला फोन केलाय.

आमदार : (गडगडाट करीत हसत) ग्रेट ज्योक ऑफ धी यीयर (पुन्हा हसतो) बाई एक लक्षात ठेवा की आमच्याइरुद्ध तुमच्याकडं काहीही पुरावा न्हाई.

शुभांगी : पुरावा – पुरावा – पुरावा. मी इतका पुरावा गोळा करणार आहे की प्रत्यक्ष परमेश्वरही तुम्हाला आता वाचवू शकणार नाही.

आमदार : असं?

(फोन ठेवते. त्यांच्या चेहऱ्यावर भलं मोठं प्रश्नचिन्ह दिसतं.)

(गोटखिंडेंचे घर. ते विमनस्कपणे खुर्चीत बसलेत. वत्सलाबाई खाली बसून भाजी निवडताहेत. एका कोपऱ्यात फोन वाजतो. बाई उठून फोन घेतात.)

वत्सलाबाई : कोल्हापूरवरनं ट्रंककॉल आलाय. उमेश बोलतोय.

गोटखिंडे : हॅलोऽऽ

उमेश : काका मी उमेश बोलतोय...

गोटखिंडे : बोल.

उमेश : तुमची प्रेस जळाल्याची बातमी इकडच्या पेपरमध्ये वाचली.

गोटखिंडे : बरं बरं...

उमेश : तुम्हाला एक सूचना करायची होती.

गोटखिंडे : काय?

उमेश : गेल्याच आठवड्यात मी कलर प्रिंटिंगची मशीन टाकलीय. मला आता माझी प्रिंटिंगची जुनी मशिनरी विकून टाकायचीय. ती जर तुम्ही घेत असाल तर...

फोन बंद करतात. घाईघाईने कपडे चढवतात.

डिझॉल्व. ट्रक कोल्हापूरला उमेशच्या दारात उभा त्यातून गोटखिंडे खाली उतरतात.

गोटखिंडे : (आनंदाने) उम्या लेका तुझ्या रुपाने परमेश्वरच धाऊन आला मदतीला. मी ट्रक घेऊनच आलो.

वत्सलाबाई : अहो काय झालं ते तरी सांगा.

गोटखिंडे : कोल्हापूरला जाऊन उम्याची प्रिंटिंगची मशिनरी घेऊन येतो.

उमेश : या काका काय ठरवलंत मग?

गोटखिंडे : अरे कसलं काय ठरवायचं लेका येताना ट्रकच घेऊन आलोय. हमालपण आणले. आत्ताच्या आता मशीन खोलून ट्रकात चढवा. रात्रीपर्यंत तिकडं फिट करुन सकाळचा अंक काढायचाय मला.

उमेश : तुमच्यावर अशी परिस्थिती ओढवलेली असताना आणि ह्या वयात ही तुमचा हा उत्साह पाहून आश्चर्य वाटतं.

गोटखिंडे : उम्या लेका हे मनगट पिचून जाईल आमचं पण उरातला आवेश मात्र अभंगच राहील.

उमेश : चला तुम्हाला तोपर्यंत माझी कलर लॅब्रोट्री दाखवतो.

(उमेश गोटखिंडेना फोटो प्रिंटिंगची नवीन मशीन दाखवत दाखवत आतल्या डार्करुममध्ये आणतो.

तिथल्या लालभडक रंगात अनेक रोल्स एक्स्पोज करुन वाळत टाकलेले आहेत. एका मोठ्या निगेटिव्हकडं गोराखिंडेंचं लक्ष जातं आणि ते आश्चर्यानं थक्क होतात.)

गोटखिंडे : उम्या लेका जरा ह्या निगेटिव्हची प्रिंट काढून दे बरं.

उमेश डेव्हलपिंगचे काम सुरू करतो.

कलेक्टर बंगला. बाई अस्वस्थपणे बसलेल्या आहेत. आमदार मोहिते येतात.

आमदार : नमस्कार बाईसाहेब.

शुभांगी : का आलात तुम्ही?

आमदार : का म्हंजे काय? आमाला कुनी चॅलेंज दिलेलं आवडत न्हाई.

शुभांगी : म्हणजे काय?

आमदार : रात्री म्हणालात ना तुम्ही, हे प्रकरण आम्हाला जड जाईल म्हणून...

शुभांगी : मग जाणारच आहे !

आमदार : पण त्या आधी तुमालाच हितनं जावं लागनार हाये.

शुभांगी : म्हणजे?

(खिशातून एक कागद काढून देतात.)

आमदार : हे घ्या.

शुभांगी : काय आहे हे?

आमदार : वाचा. वाचा. तुमच्या बदलीची आर्डर. पंजाबात बदली झालेय तुमची. तुमच्या सारख्या तडफदार अधिकाऱ्याची आज पंजाबला खरी गरज हाय. कधी ठिवायचा निरोपसमारंभ?

शुभांगी : मोहितेसाहेब मी असल्या पुळचट आदेशाना भिक घालणारी बाई नाही. हे घ्या (कागद त्याच्या हातात कोंबते)

आमदार : ह्याचं मी काय करु !

शुभांगी : सुरंळी करुन गांडीत घाला!

आमदार : (थक्क) बाई तुमच्यासारक्या आधिकाऱ्याला आसलं बोलनं सोबत नाही.

शुभांगी : अधिकारी म्हणून नाही तर एक सामान्य स्त्री म्हणून बोलतेय मी.

आमदार : म्हंजे ?

शुभांगी : कलेक्टरशिपचा राजीनामा सकाळीच पाठवून दिलाय मी.

(आमदार मोहीते तोंडाचा आऽऽ करुन पहातच रहातात. त्या आऽऽ मध्ये शुभांगीच्या चेहेऱ्याचा क्लोजप. ती मोठ्याने घोषणा देते. महिलांचा मोठा मोर्चा निघालाय त्यात 'स्त्री अत्याचार विरोधी आघाडी' 'महिला अन्यायविरोधी मंच' 'हुंडा प्रतिबंधक व्यासपीठ' असे फलक दिसतात. साताठशे महिलांचा मोर्चा आमदारांच्या घरावर चालला आहे.)

आमदार : आमदार मोहिते

इतर : मुर्दाबाद !

मा. : सर्जेराव मोहिते

इतर : मुर्दाबाद !

मा. : आमदार मोहिते

इतर : मुर्दाबाद !

मा. : सर्जेराव मोहिते

इतर : मुर्दाबाद !

मा. : बेबी सोनवणे आगे बढो...

इतर : हम तुम्हारे साथ है.

मा. : सोनवणे बलात्कार प्रकरणाची चौकशीऽऽ

इतर : झालीच पाहिजे.

मा. : गली गली मे कोन है?

इतर : मोहिते दोनो चोर है

(अशा घोषणा देत मोर्च्या गांधी पुतळ्याजवळ येतो. तिथे आल्यावर. शुभांगी पुढे येते आणि नानासाहेबांच्या पायावर डोकं ठेवते. त्यांच्या विश्वास बसत नाही.)

नानासाहेब : (तिला वर उठवत) काय बघतोय मी हे बेटा?

शुभांगी : नानासाहेब नोकरीचा राजीनामा दिलाय मी.

नानासाहेब : घराण्याचं नाव उज्ज्वल करणारा निर्णय घेतलास तू बेटा.

शुभांगी : मला हेच उत्तर तुमच्याकडून हवं होतं.

नानासाहेब : म्हणजे काय बेटा?

शुभांगी : तुम्ही ज्याना गुरु मानता त्या तात्यासाहेब बापटांची मी मुलगी.

(आनंदातीरेकाने तिला छातीशी धरतात. त्यांच्या डोळ्यात अश्रू.)

शुभांगी : या लढ्यात मी तुमच्यासोबत आहे नानासाहेब. आमदार मोहित्याच्या घरावर मोर्चा घेऊन चाललेय. नाही त्याची गाढवावरनं धिंड काढली तर बापटांचं नाव लावणार नाही.

(नानासाहेब तिच्याकडं कौतुकानं पहातच रहातात. त्यांच्या डोळ्यातून डिझॉल्व होत मोर्चा पुढे सरकत राहतो.)

Cut to Darkroom

प्रिंट तयार होते. फोटोत सर्जेरावाने बेबीच्या छातीला हात घातल्याचे दिसते. गोटखिंडेंचे डोळे त्या लाल रंगाच्या प्रकाशात उजळून निघतात.

तो आणि तसलेच दोन-तीन फोटो टाकून पेपरचे पाहिले पान कंपोज झालेले आहे. मशीन धडधडते. हजारो कॉपिज् बाहेर पडतात. बातमी अशी- बदमाश सर्जेराव मोहितेच्या बलात्काराचा हा घ्या पुरावा.

हजारोंच्या संख्येने लोक पेपर वाचताहेत. पेपर घेऊन गोटखिंडे आपल्या गाडीतून गांधी पुतळ्याजवळ येतात. तिथे आधीच शुभांगी, तुळपुळे आणि नानासाहेब पेपर वाचत बसलेले आहेत. गोटखिंडे नानासाहेबांना मिठी मारतात.

गोटखिंडे : नानासाहेब तुम्ही म्हणालात तेच खरं झालं. परमेश्वर माझ्या मदतीला धावून आला. सर्जेरावाच्या त्या मूर्ख साथीदारांनी हा रोल कोल्हापूरला डेव्हलपिंगसाठी दिला होता आणि तो आयताच माझ्या हातात पडला.

(इतक्यात सुभद्राताई घाबऱ्या घुबऱ्या होऊन येतात.)

सुभद्राताई : अहो घात झाला.

नानासाहेब : काय झालं?

सुभद्राताई : सर्जेराव आणि त्याचे गुंड घरी आले होते, माधुरी आणि निवेदिताला उचलून नेलंय त्यांनी.

गोटखिंडे : नानासाहेब आता वेळ घालवून फायदा नाही उठा.

शुभांगीने गोटखिंडेंची गाडी स्टार्ट करुन रिव्हर्स टाकून नानासाहेबांपर्यंत आणलेली असते. तळपुळे गोटखिंडे पटकन गाडीत बसतात आणि नानासाहेब आपला चरखा मिटून मांडीवर घेऊन पुढच्या सीटवर बसतात.

कचकन ब्रेक्स दाबत गाडी गोडाऊनच्या दारासमोर उभी राहते. पटापट सर्वजण उड्या मारुन उतरतात आणि खाली तळघरातील गोडवूनमध्ये येतात. तेथे माधुरीला आणि निवेदिताला बांधून ठेवलेली असते. तिथेच

सर्जेराव आणि त्याचे गुंड तलवारी हातात घेऊन उभे असतात. नानासाहेब आलेले पाहून.

सर्जेराव : जब गिदडकी मौत आती है तब वो शहरकी ओर भागता है. (हसतो)

नानासाहेब : सर्जेराव तुझं सर्व पितळ उघडं पडलंय आता. निमूटपणे माधुरीला आणि निवेदिताला आमच्या हवाली कर!

सर्जेराव : (गडगडाट करीत हसत) हे थेरडं चरखा घेऊन आपल्या लेकीला आणि नातीला सोडवायला आलंय. (पुन्हा हसतो) ऐक थेरड्या, ज्या दिवशी ह्या तुझ्या ह्या पोरीने कॉलेजात आपल्या खेटरानं मला मारलं उस दिनसे एक जखम दिल मे लेकर जी रहां हू. आणि आज ही अशी तुझ्या समोरच माज्या तावडीत सापडलेली असताना तिला सोडून देऊ? (पुन्हा हसतो) क्यूं छम्मक छल्लो ?

(तिच्या गालाला हात लावतो.)

गोटखिंडे : (ओरडतो) सर्जाऽऽऽ

नानासाहेब : (हातानेच गोटखिंडेला शांत करतात)

गोटखिंडे : नानासाहेब प्रत्यक्ष तुमच्या समोर तुमच्या पोटच्या पोरीची हा सैतान विटंबना करतोय आणि तुम्ही मला शांत राहायला सांगताय? नरडीचा घोट का नाही घेत तुम्ही त्याच्या?

नानासाहेब : (शांतपणे) हिंसा माझ्याजवळ यायला लाजतेय त्याला मी काय करु बापू? सर्जेराव खूप झालं आता. (चरख्यासह पुढं येत) मी आता निर्वाणीचं सांगतोय सोडून द्या त्या दोघींनाही.

सर्जेराव : (हसत) आरं येडा का खुळा तू म्हाताऱ्या? आरं आता तुज्या समोरच तुज्या पोरीचा भोग घेतो बग मी !

(तो तलवारीचं टोक माधुरीच्या ब्लाऊज मध्ये खुपसतो आणि टर्रकन तिचा ब्लाऊज फाडतो. नानासाहेबांचे डोके गरगरते साऱ्या आयुष्यभर केलेली अहिंसेची साधना त्यांच्या भवती फिरायला लागते. ते प्रचंड क्रोधायमान होतात आणि सर्व ताकद लावून हातातला चरखा सर्जेरावाच्या डोक्यात घालतात.

'रघुपती राघव राजाराम' हे भजन पार्श्वभूमीवर सुरू होते आणि एका क्षणात त्या गोडाऊनला युद्धभूमीचे स्वरुप येते. तुळपुळे, गोटखिंडे आणि नानासाहेब हे जुन्या पिढीतील सकस अन्नवर पोसलेले मजबूत हाडाचे क्रांतीकारक!

नवीन लढाईचे तंत्र त्याना जरी अवगत नसले तरी हातात येईल त्या वस्तूने ते गुंडांशी मुकाबला सुरू करतात. शुभांगीने तर कराटेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतलेले असते. तीही आपला इंगा दाखवायला सुरूवात करते. नानासाहेबांच्या हातात चरखा असतो. त्याने त्याला ते झोडपत झोडपत एका बाजूला नेतात. तिथल्या एका दरवाजावर तो धाडकन आपटतो. त्यामुळे तो दरवाजा उघडला जातो. आतमध्ये पहातात तर आत त्यांच्या जावईबापूंना बांधून ठेवण्यात आलेले असते. जवळजवळ वेड लागेल अशा स्थितीला तो आलेला असतो. नानासाहेब धावतच त्याच्याजवळ जातात आणि त्याला सोडवत.

नानासाहेब : जावईबापू तुम्ही इथं?

जावईबापू : मला ह्या बदमाश सर्जेरावानं पळवून आणून वर्षभर इथं डांबून ठेवलं होतं.

(नानासाहेब जावयाशी बोलत असतात तोवर सर्जेरावाचे लक्ष पलिकडे पडलेल्या तलवारीकडं जातं. तो तलवार उचलतो आणि पाठीमागून नानासाहेबांच्या पाठीत खुपसणार एवढ्यात एक क्रूद्ध गर्जना ऐकू येते आणि दरवाजातून कॅप्टन सोनावणे सर्जेरावावर झेप घेतो. तलवारीचा घाव चुकतो आणि कॅप्टन आपल्या कुबड्यानी सर्जेरावास बेदम बदडायला सुरूवात करतो. तो इतका संतप्त झालेला असतो की कुबडीच्या एका निर्णायक घावाने तो सर्जेरावाला जवळ जवळ बेशुद्ध करतो. तोवर इकडे सर्व बदमाश निपचित झालेले असतात. माधुरीची आणि तिच्या नवऱ्याची तसेच निवेदिताची गोड भेट झालेली असते. नानासाहेब झपकन दरवाजाच्या आड जाऊन थांबलेले असतात. आता दरवाजात आमदार मोहिते हातात बंदूक घेऊन उभे.)

आमदार : वा वा बहोत खूब! स्वातंत्र्यसैनिकांचं सगळं घरानंच तावडीत सापडलं... ह्याला म्हणतात दैवयोग. आता एकेकाला रांगेनं यमसदनाला पाठवतो.

(आमदार नेम धरतात. तोवर नानासाहेब आपल्या हातातल्या चरख्यानं त्यांची बंदुक उडवतात आणि नंतर मग चरख्यांनच त्यांना मारत मारत बाहेर आणतात. बाहेर आल्यावरही ते त्यांना तसेच ठोकत ठोकत गांधीजींच्या पुतळ्यापर्यंत आणतात. त्यांच्यामागोमाग इतर सर्व मंडळी. नानासाहेबांच्या अंगात आता सहस्त्र क्रांतीकारकांचं बळ संचारलेलं. ते पुतळ्याजवळचा आपला पंचा उचलतात आणि मोहितेंच्या मानेभोवती गुंडाळून त्यांचे डोके त्या पुतळ्यावर धाडधाड आपटू लागतात. इतके की तो पुतळाही हादरु

लागतो. नंतर नानासाहेब त्याच पंचाचा फास करून आमदाराचा गळा आवळू लागतात. आमदार भेदरुन पुतळ्याच्या पायाशी पडतो.

सायरन वाजवत पोलिसांच्या गाड्या येतात. पोलीस नानासाहेबाना पकडतात. क्षणभर आपले हात जोडून ते तसेच गांधीजींच्या पुतळ्याला नमस्कार करतात आणि म्हणतात, “माफ करा बापूजी पण मूल्यांच्या रक्षणासाठी जर हिंसा करायची वेळ आली तर ती एक अहिंसाच मानायला हवी.”

वैष्णव जन तो तेणे कहिए या भजनाचे सूर ऐकू येऊ लागतात.

भजनाच्या सुरावटीवर श्रेयनामावली पडू लागते आणि त्याच बरोबर खालील दृष्ये अनुक्रमाने दिसू लागतात.

1 आमदारांच्या हातात बेड्या पोलिस त्यांना घेऊन जात आहेत.

2 न्यायमूर्ती निकाल वाचत आहेत. सर्जेराव तुरूंगातील गजांमागे कैद्याच्या वेशात.

3 शुभांगी बापट यांचा राजीनामा मुख्यमंत्री फाडून टाकत आहेत. त्या नव्या जोमानं दुष्काळ निकरणाच्या कामाला लागलेल्या.

4 एस.पी. ना कर्तव्यपालन न केल्यामुळे सस्पेंड केल्याची बातमी वृत्तपत्रात दिसत आहे.

5 गोटखिंडे यांची नवी प्रिटिंग प्रेस उभी राहिलेली. प्रेसचा शुभारंभ.

6 कॅप्टन सोनवणे त्यांच्या एका मत्स्यशेतीच्या तलावाजवळ उभे. ओढले जाणारे जाळे. त्यात चंदेरी माशांच्या ढिग. बेबी एक मोठा मासा हातात घेऊन आंनदाने राजारामला दाखवत आहे. तो खूष.

7 माधुरी नव्या उत्साहानं वर्गात शिकवत आहे. तिचे मिष्टर बाहेरून घंटा वाजवून शाळा सुटल्याचे दर्शवितात. सारी मुले आनंदाने बाहेर पळतात. माधुरी मिष्टरांकडे लटक्या रागाने पाहते आणि त्यांच्या मिठीत शिरते.

8 निवेदिताला नानासाहेब राक्षसाची काहाणी सांगत आहेत पण ती स्वत:च क्लायमॅक्स सांगून त्यांना चकीत करते. ते तिचा गालगुच्चा घेतात.

9 गांधीजींचा पुतळा दिसतो. भजनाचे सूर वाढत जातात. ‘समाप्त’ची पाटी.

*****